मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ८० शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# मुंबईतील प्रदूषित हवेची हायकोर्टाकडून दखल

## शुक्रवारच्या सुनावणीत महापालिकेला स्पष्टीकरण देण्याचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** गेल्या काही दिवसांत हवेची गुणवत्ता ही सध्या खराबहून अतिखराब वर्गात पोहोचलीय. वातावरणात पसरलेली धूळ आणि धुराचे कण यामुळे दृश्यमानता अतिशय कमी झालीय. या गोष्टीची दखल घेत यासंदर्भात दाखल जनहित याचिकेवर उद्या शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी घेण्याचं निश्चित केलंय.

एक्युआयच्या मुद्द्यावर हायकोर्टात तातडीची सुनावणी - मुंबईत खासकरून हिवाळ्याच्या दिवसांत घसरणाऱ्या 'एअर क्वालिटी इंडेक्स'(AQI) वरून हायकोर्टानं सुमोटो याचिका दाखल केली होती. या याचिकेत हायकोर्टानं ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ दरायस खंबाटा याची



अमायकस क्युरी (कोर्टाचा मित्र) म्हणून नियुक्ती केलीय. ज्यात वनशक्ती या पर्यावरणवादी संस्थेतर्फे हस्तक्षेप याचिका दाखल करत जनक द्वारकादास यांनीही युक्तिवाद केला होता. साधरणत: वर्षभरापूर्वी झालेल्या सुनावणीत एक्युआय सुधारण्यासाठी एकूण 27 उपाययोजनांची यादी दिली गेली होती. ज्यांचा स्वीकार करत बीएमसीनं 12 जूनपर्यंत आपला अहवाल सादर करणं अपेक्षित होतं. मात्र हा अहवाल विचारणा करूनही अद्याप सादर झालेला नसल्याची माहिती गुरुवारी वनशक्तीतर्फे जनक द्वारकादास यांनी कोर्टाला दिली. याची नोंद घेत मुंबई महापालिकेला स्पष्टीकरण देण्याचे निर्देश देत हायकोर्टानं उद्या शुक्रवारी यावर तातडीची सुनावणी घेण्याचं निश्चित केलंय. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठापढे उद्या तातडीची सुनावणी होणार आहे. मुंबईकरांमध्ये वाढतायत श्वसनाचे विकार - या परिस्थितीमुळे मुंबईकरांना सध्या खोकला आणि घश्याचा त्रास जाणवू लागलाय. अशा परिस्थितीत श्वसनाचे विकार असलेल्यांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. तापमानात अचानक झालेली घट आणि समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यांचा मंदावलेला वेग यामुळे पुढचे काही दिवस हीच परिस्थिती कायम राहण्याची चिन्हं आहेत. याशिवाय मुंबईत कोस्टल रोडची अखेरची कामं, मेट्रो यांसारखी विकासकामंही युद्धपातळीवर सुरू असल्यानं हे प्रदूषण येत्या काळातही कायम राहणार आहे. मुंबईचा एअर क्वालिटी इंडेक्स 270 वर - मुंबईकरांसाठी चिंता वाढवणारी गोष्ट म्हणजे, वाढत्या प्रदूषणामुळे इथल्या हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासाळत चालली आहे. सध्या मुंबईचा एअर क्वालिटी इंडेक्स (AQI) 270 या खराब प्रकारात असून, तो 300 ते 400 या 'अत्यंत खराब' पातळीच्या जवळ पोहोचलाय. ज्यामुळे मुंबईकरांना श्वसनाच्या समस्या जाणवू लागल्या आहेत.

## पनवेल शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी वर्गासह कर्मचाऱ्यांना करण्यात आले सन्मानित



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** :पनवेल शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी वर्गासह कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तालय नवीमुंबई यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे .

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते पनवेल शहर पोलीस ठाण्याचे म सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा मुंढे , पोहवा माधव शेवाळे , मपोशी साधना पवार , पोना सम्राट डाकी , रवींद्र पारधी आदीनी आता पर्यंत केलेल्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल त्यांना प्रोत्साहनपर प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले .

## खोपोली नगरपरिषद निवडणुकीत भाजपा महायुतीची उत्साहपूर्ण प्रचारफेरी




**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : खोपोली नगरपरिषद निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी भाजपा महायुतीतर्फे भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. प्रचंड उत्साहात पार पडलेल्या या प्रचारफेरीत कार्यकर्त्यांनी विजयी घोषणांनी आसमंत दुमदुमून संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. या जोशपूर्ण वातावरणाला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. या प्रचारफेरीत भाजपाचे खोपोली निवडणूक निरीक्षक पनवेलचे माजी नगरसेवक तसेच भाजपा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, निरीक्षक भाजपा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील घरत यांच्यासह पदाधिकारी व मोठ्या संख्येने उपस्थित कार्यकर्त्यांसह सहभागी झाले होते. भाजपा महायुतीचे उमेदवार इंदरमल खंडेलवाल, संजय तन्ना, मयुरी शेलार आणि सोनिया रुपवते यांनी नागरिकांशी संवाद साधत पक्षाची विकासनिष्ठ भूमिका पटवून दिली. या उमेदवारांच्या उत्साही सहभागामुळे आणि प्रभावी जनसंपर्कामुळे जनतेची मने जिंकण्यात महायुतीला मोठ्या प्रमाणात यश मिळाल्याचे चित्र दिसून आले.

## चिखलीत नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या प्रचार कार्यालयाचे आमदार श्वेता महाले यांच्या हस्ते उद्धाटन..

**दैनिक युवक आधार**

**चिखली (सिद्धार्थ धंदरे) चिखली :** भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या प्रचार कार्यालयाचे उद्धाटन चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना आ. सौ. महाले यांनी चिखली शहराच्या पायाभूत सुविधांपासून नागरी सेवांपर्यंत अनेक विकास विषयांवर अपेक्षा व्यक्त केल्या. त्यानुसार शहरात येत्या काळात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्थापन आणि सार्वजनिक सोयीसुविधा यांसारख्या क्षेत्रांत अधिक प्रभावी कामांची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले.त्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करून चिखली न. प. वर कमळ फुलवायचे आहे, असे त्या म्हणाल्या.

आमदार श्वेता महाले यांनी चिखलीतील



नागरिकांच्या मागण्या, शहराची वाढती लोकसंख्या, तसेच भविष्यातील विकास आराखडा यांचा उल्लेख करत, "स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सक्षम नेतृत्व आणि सातत्यपूर्ण कामकाजाची गरज आहे," पंडितदादा यांच्या रूपाने आपण अतिशय सक्षम उमेदवार दिलेला असून त्यांना मोठ्या पदाधिक्याने विजयी करायचे आहे असे मत व्यक्त केले. तसेच राज्य व केंद्र सरकारद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध नागरी सुविधा योजनांमुळे शहरांना विकासाची संधी मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## अंध अल्पवयीन मुलीवर अत्याचार; पित्याला २५ वर्षे सश्रम कारावास

**दैनिक युवक आधार**

**नाशिक (राहुल कुलकर्णी)** : अल्पवयीन अंध मुलीवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप सिद्ध झाल्याने निफाड येथील



अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कोर्हाळे यांनी आरोपी पित्याला २५ वर्षे सश्रम कारावास व २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास एक वर्षे अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

घटनेची माहिती अशी की, पीडित मुलगी (१७) ही अंधत्वामुळे मालेगाव येथील अंध शाळेत शिक्षण घेत होती. सन २०१४ मध्ये सुट्टीच्या काळात ती मूळ गावी दात्याणे (ता. निफाड) येथे येत असे. त्या काळात तिच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत आरोपी वडिलांनी तिच्यावर सतत लैंगिक अत्याचार केल्याचे न्यायालयात सिद्ध झाले.

शाळेत दाखल झाल्यानंतर नियमित वैद्यकीय तपासणीदरम्यान पीडिता गरोदर असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पीडितेने प्रथमच पित्याविरुद्ध तक्रार नोंदवली. ओझर पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३७६ तसेच पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी भगवान मथुरे यांनी पीडिता, नातेवाईक, तसेच न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेचा डीएनए अहवाल अशा सर्व पुराव्यांसह आरोपपत्र न्यायालयात दाखल केले.सरकार पक्षातर्फे सहायक जिल्हा सरकारी वकील ॲड. रमेश कापसे यांनी १८ महत्वाच्या साक्षीदारांची साक्ष नोंदवत प्रभावी युक्तिवाद केला. पैरवी अधिकारी म्हणून पोलीस हवालदार रत्नाकर बागुल यांनी काम पाहिले. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपी पित्याला दोषी ठरवत शिक्षा सुनावण्यात आली.

## पनवेल प्रेस क्लबतर्फे सोसायट्यांच्या स्वपुनर्विकासावर विशेष चर्चा सत्राचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : संविधान दिनाचे औचित्य साधून पनवेल प्रेस क्लबतर्फे 'सोसायट्यांचा स्वपुनर्विकास : पनवेलचा शाश्वत विकास' या विषयावर विशेष चर्चा सत्र आयोजित करण्यात आला आहे. सदर चर्चासत्र रविवार, ३० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे.

पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष देविदास गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. या सत्रासाठी ज्येष्ठ वास्तुविशारद आणि माजी म्हाडा अध्यक्ष मा. चंद्रशेखर प्रभू हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात सोसायट्यांच्या स्वपुनर्विकासाची गरज, प्रक्रिया, शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच पनवेलच्या शाश्वत विकासातील पुनर्विकासाचे स्थान या सर्व बाबींवर ते मार्गदर्शन करणार आहेत.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणावर डेव्हलपमेंटची कामे सुरू असताना, नागरिकांनी स्वपुनर्विकासाच्या प्रक्रियेत होणारे फायदे, आर्थिक गणित, तसेच




कायदेशीर बाबी समजून घेणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर होणारे मार्गदर्शन नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

पनवेल शहराचा वेगाने होणारा विकास आणि वाढती गृहनिर्माण गरज लक्षात घेता, अशा प्रकारची जाणिवजागृती व तज्ज्ञांचे मार्गदर्शन ही काळाची गरज असून, हा उपक्रम नागरिकांना योग्य दिशा देणारा ठरेल, असे संस्थेचे अध्यक्ष देविदास गायकवाड यांनी सांगितले

या कार्यक्रमासाठी पनवेल प्रेस क्लबचे संस्थापक सदस्य संतोष घरत, उपाध्यक्ष सागर पगारे, सचिव भागवत आहीरे, खजिनदार शैलेश चव्हाण, सहसचिव सुनील पाटील, सहखजिनदार प्रसाद परब, विकास पाटील, राजेश कदम, सनिप कलोते, राजेंद्र सदावर्ते, अविनाश पाटील, सुनील भुजबळ, अनिल पाटील, राहुल बोर्डे, रोहित घाडगे, सुनील कोळी, ॲड. चंद्रकांत मढवी, विजयकुमार जंगम, बल्लाळ पाटील, निवृत्ती पाटील, सदस्य उपस्थित राहणार आहेत.

## मुंबई गोवा महामार्गावर शिवशाही बस टेम्पो ट्रक यांचा भीषण अपघात अपघातात सहा प्रवासी जखमी

**दैनिक युवक आधार**

**माणगांव प्रतिनिधी** : मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार 26 नोव्हेंबर सकाळी सात वाजण्याच्या सुमारास मुंबई बाजूकडून येणारी मुंबई मालवण ही शिवशाही बस महाड बाजूकडे जात असताना समोरून महाड बाजू कडून येणारा टेम्पो ट्रक याला जोरदार ठोकर मारून हा अपघात झाल्याचे समजते यामध्ये जखमी प्रवाशांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले घटनास्थळी महाड महामार्ग पोलीस महाड एमआयडीसी मार्ग टीम घटनास्थळी रवाना झाली त्यामध्ये केवा कंपनीचे श्री विकास सासने आणि आपटे ऑरगॅनिक कंपनीचे रोहन तांबे यांनी मदत केली सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही घटनास्थळी एस आर व्ही रेस्क्यू टीम इमरान ढवळांकर



दाखल होऊन क्रेनच्या साह्याने दोन्ही वाहनबाजू करण्यात आले ट्रॅफिक सुरळीत करण्यात आलीमाणगाव वाहतूक शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल एच डी बांडे ,माणगाव पोलीस ठाणे कडील पोह काळे, पोलीस कॉन्स्टेबल पाटील व पोलीस कांबळे तसेच एम आय डी सी मार्ग टीम घटनास्थळी रवाना झाली त्यामध्ये केवा कंपनीचे श्री विकास सासने आणि आपटे ऑरगॅनिक कंपनीचे रोहन तांबे यांनी मदत केली सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही घटनास्थळी रेस्क्यू टीम इमरान ढवळांकर दाखल होऊन क्रेनच्या साह्याने दोन्ही वाहन बाजू करण्यात आले काही वेळातच ट्रॅफिक सुरळीत करण्यात आली, त्याचप्रमाणे जखमी तसेच एक मयत व्यक्तींचे नावे खालील प्रमाणे( मयत) १)श्याम सुंदर गावडे ;वय 85 वर्षे राहणार कंदमवर ,नगर विक्रोळी मुंबई. जखमी पुढील प्रमाणे नाव पत्ता* 1. दिपाली तुकाराम मोगल वय 30 वर्षे राहणार आमटेम तालुका माणगाव 2. प्रशांत शशिकांत राजे शिर्के वय 40 वर्षे राहणार कोळमाळ तालुका चिपळूण 3. सुप्रिया सुधाकर मोरे वय 55 वर्षे राहणार विक्रोळी मुंबई 4. अंकुश चंद्रकांत मिस्त्री वय 54 वर्षे राहणार मालवण जिल्हा सिंधुदुर्ग 5. प्रतिभा प्रकाश नागवेकर वय 59 वर्षे राहणार संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी 6. आर्या अमित मयेकर वय 38 वर्षे राहणार संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी 7. आयशा अमित मयेकर वय 06 वर्षे राहणार संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी 8. गायत्री अमित मयेकर वय 13 वर्षे राहणार संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी 9. संतोष बंधूराव शेलार वय 52 वर्षे राहणार पाचोळे तालुका मानगाव 10. राजेंद्र बंधुराव शेलार वय 43 वर्षे राहणार पाचोळे तालुका मानगाव 11. प्रवीण बन्यामीन वसावे वय 37 वर्षे राहणार नंदुरबार सध्या राहणार सिंधुदुर्ग 12. अक्षता अनंत पिळणकर वय 40 वर्षे राहणार आरवली संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी.

# गवळी विद्यालयाची कु. गौरी विजय झळके राज्यस्तरावर

**दैनिक युवक आधार**

**वाशिम (करण धोंगडे) :** मालेगाव अमानी येथील स्व.शंकरराव गणुजी गवळी विद्यालय येथील वर्ग ९ वीची विद्यार्थिनी कु.गौरी विजय झळके हिने दिनांक २४/११/२०२५ रोजी वाशिम जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न झालेल्या अमरावती विभागीय शालेय कुराश क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकाविले.

वाशिम जिल्हा क्रीडा संकुल येथे अमरावती विभागीय शालेय कुराश क्रीडा स्पर्धा २०२५~२६ चे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अमरावती विभागातील वाशिम, बुलढाणा, यवतमाळ,अकोला व अमरावती या पाचही जिल्ह्यातील विविध खेळाडू हे कुराश क्रीडा स्पर्धेसाठी वाशिम येथे बहुसंख्येने आले होते. यामध्ये अमानी येथील स्व. शंकरराव गणुजी गवळी विद्यालयाची कु. गौरी विजय झळके हिची लढत कु.जानवी संतोष भिवटे हीच्यासोबत झाली व कु. गौरी झळके हिने सुवर्णपदक पटकावले.कु. गौरी विजय झळके हिचा सत्कार दि. २६/११/२०२५ रोजी विद्यालयात छोटेखानी समारंभात करण्यात



आला. विद्यालयातील मुख्याध्यापक अनिल गवळी , ज्येष्ठ शिक्षक व्ही.के.खिल्लारे, पी.एस. सरनाईक ,आर बी.नव्हाळे यांनी तिला पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व राज्यस्तरासाठी शुभेच्छा दिल्या.कु. गौरी विजय झळके ही दिनांक २७ व २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान शहा सांस्कृतिक भवन, इंदापूर जि. पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत अमरावती विभागाचे नेतृत्व करणार आहे.कु. गौरी विजय झळके ची आपल्या यशाचे श्रेय जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे सर श्री.राजेंद्र सौदागर सर,असोसिएशन चे अध्यक्ष श्री.अनिल बोंडे ,आई-वडील,शाळेतील शिक्षक,मुख्याध्यापक अनिल गवळी तसेच क्रीडा शिक्षक एन.डी.भिंगे यांना देते. तिच्या सत्कार प्रसंगी शाळेतील ओ.एल. सरकटे, व्ही.बी. गवळी, डी.जी.तागड. व संदीप ठाकरे हे उपस्थित होते.

# रस्त्यावरून आश्रयाच्या उंबरठ्यावर; संविधान दिनी दोन भटक्या मुलींना नवजीवन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक (राहुल कुलकर्णी) :** पिंपळगाव बसवंतच्या गेल्या काही महिन्यांपासून गजबजलेल्या रस्त्यावर भीक मागत भटकताना दिसणाऱ्या दोन चिमुरड्यांच्या आयुष्यात संविधान दिनी मोठा बदल घडला. कोणताही आधार, कागदपत्रे, संरक्षण किंवा ओळख नसलेल्या या दोन्ही मुलींना अखेर अधिकृत जन्मदाखला मिळत शैक्षणिक आयुष्याचा नवीन अध्याय सुरू झाला आहे.

रस्त्यावर असुरक्षित अवस्थेत दिसणाऱ्या या मुलींकडे पत्रकार गणेश शेवरे, उद्धवराजे शिंदे आणि गोकुळ खैरनार यांनी संवेदनशीलतेने लक्ष दिले. त्यांनी ही बाब तत्काळ पिंपळगाव ब. पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी यांना कळवली.



**संविधान दिनी दोन्ही चिमुरड्यांना अधिकृत जन्मदाखला देताना निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या सोबत आश्रमाचे संस्थापक नवनाथ नारायण जऱ्हाड.**

तिवारी यांनी विलंब न करता कारवाई करत मुलींना सुरक्षिततेसाठी सैंगऋषी अनाथ वृद्धाश्रम, लौकी शिरसगाव (ता. येवला) येथे दाखल केले. आश्रमाचे संस्थापक नवनाथ नारायण जऱ्हाड यांनी दोन्ही मुलींना मायेने आश्रय दिला.

तथापि, शिक्षण व पुनर्वसन प्रक्रियेसाठी सर्वात मोठे आव्हान होते ते त्यांची 'ओळख' निर्माण करण्याचे. जन्मदाखला नसल्यामुळे शिक्षणाचा मार्ग बंद होता. यासाठी पिंपळगाव बसवंत नगरपालिकेत जन्मदाखल्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला. कर्मचारी राकेश देशमुख, संतोष डेरे आणि संपूर्ण कर्मचारीवर्गाने प्रकरणाची तत्काळ दखल घेत काम वेगाने सुरू केले. मंत्री छगन भुजबळ यांच्या निर्देशांमुळे तसेच निलेश लचके (लासलगाव) व संतोष गिरी (निफाड) यांच्या पाठपुराव्यामुळे ही प्रक्रिया आणखी गतीमान झाली.

गटशिक्षणाधिकारी संजय कुसळकर यांनी मुलींची शैक्षणिक पात्रता तपासली. तर वयाची अधिकृत पडताळणी आणि जन्मदाखला तयार करण्याची महत्त्वाची जबाबदारी निफाड तालुक्याचे तहसीलदार विशाल नाईकवाडे आणि त्यांच्या टीमने अत्यंत दक्षतेने पार पाडली.

संविधान दिनी दोन्ही मुलींना — रेणुका संतोष पवार आणि लक्ष्मी संतोष पवार — या नावांनी अधिकृत जन्मदाखले देण्यात आले. एकीचा इयत्ता चौथीत तर दुसरीचा तिसरीत प्रवेश निश्चित झाला आहे.

रस्त्यावर भीक मागत जगणाऱ्या या दोन मुलींना सुरक्षित छत, प्रेमाने आधार देणारा आश्रम आणि शिक्षणाची पहिली पायरी मिळावी यासाठी पत्रकार, पोलिस विभाग, नगरपालिका, शिक्षण विभाग आणि तहसील कार्यालय अशा विविध घटकांनी एकत्रित प्रयत्न केले.

धुळीत लोळत असलेल्या या दोन कळ्यांना आज नव्या भविष्याच्या बागेत फुलण्याची संधी मिळाली आहे. माणुसकी अजून जिवंत असल्याची ही हृदयस्पर्शी साक्ष.

# खोपोली नगरपरिषद प्रभाग क्रमांक 6 मधून आम आदमी पार्टी चे अधिकृत उमेदवार सौ.मदिना अशफाक पटेल यांची नीवडणुकी साठी जोरदार तयारी

**दैनिक युवक आधार**

**खालापू (संतोष शेवाळे) :** खोपोली नगरपरिषदेच्या वोर्ड क्रमांक 6 मधून आम आदमी पार्टी चे अधिकृत उमेदवार म्हणून सौ मदिना अशफाक पटेल या निवडणुकीच्या रिंगणात निवडून येण्याच्या जय्यत तयारीने प्रचाराच्या तयारीला सुरुवात केली. खोपोली वॉर्ड क्रमांक 6 मधून स्थानिक महिला मंडळ, मित्र परिवार, युवा मंच, नवतरुण मंडळ, व नागरिकांच्या पाठिंब्यामुळे त्यांच्या उमेदवारीकडे सध्या संपूर्ण वॉर्ड चे लक्ष लागले आहे.

खोपोली मध्ये जन्मलेल्या व लहानाच्या मोठया झालेल्या, अनेक वर्ष खोपोलीत राहत असून खोपोली करांच्या अनेक समस्या जाणत असून त्या सोडविण्यासाठी गेली अनेक वर्ष पती अशफाक पटेल यांच्या बरोबर सामाजिक कामामध्ये सक्रिय राहत अशफाक भाई पटेल युवा मंच व खिदमते खल्क सामाजिक संस्था मार्फत अनेक शैक्षणिक, संस्कृतीक, समाजाच्या उपयोगी असणारे कार्य, उद्योजक अशफाक भाई पटेल यांच्या मार्फत कार्यक्रम करत आले. स्थानिक नागरिकांमध्ये मदिना




अशफाक पटेल यांचे व्यक्तिमहत्व साधे, सर्वसामावेशक, आणि सेवा भावी म्हणून ओळखले जाते. निवडून आल्यास वॉर्ड 6 मधील मूलभूत सुविधा लोकांना देण्याचा प्रथम काम करणार. पाणी, रस्ते, प्रकाश योजना, नाले सफाई, पार्किंगची सुविधा, महिलांसाठी सुसज्य टॉयलेट, मुलांसाठी गार्डन, या सर्व विकास कामासाठी निवडणूक लढवून लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक आठवड्यात लोकांना वेळ देणार . "एक मत मदिना अशफाक पटेल साठी, "एक मत विकासासाठी".

मदीना अशफाक पटेल ह्या नेहमी काम करणाऱ्या व सदैव लोकांच्या मध्ये उपलब्ध असणाऱ्या व्यक्ती आहेत असे मत जनतेने व्यक्त केले.

कोणतेही राजकारण नाही तर फक्त समाजकारण हे धोरण ठेवत खोपोली नगरपरिषद निवडणुकीत वॉर्ड क्रमांक 6 हा विकास आणि पारदर्शकतेचि लढत म्हणून पाहिलं जात आहे.

"नव्या पर्वाची नवी सुरुवात, प्रामाणिक पणे सोबत प्रत्येक संघर्षात." भ्रष्टाचार विरोध आवाज उठवत सामान्य जनतेला न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी, लोकांना मुलभूत सुविधा देण्यासाठी , लोकांनी मतांच्या स्वरुपात आपला आशीर्वाद देऊन खोपोली नगरपरिषद मधे नगरसेवक म्हणून निवडून देऊन प्रभाग क्रमांक 6 चा विकास करण्यासाठी मतदान मंगळवार दिनांक 2 डीसेंबर 2025 रोजी वेळ सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 पर्यंत आहे सौ मदिना अश्फाक पटेल ह्याची नीशाणि झाडु समोरील बटन दाबुन प्रचंड बहुमताने विजयी करावे.

# दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया आणि बोद्धजन पंचायत समिती तळा यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**बोरघर /माणगाव विश्वास गायकवाड :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तालुका शाखा तळा आणि बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा व उपशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ७६ वा संविधान दिन बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी ज्ञान, विचार आणि राष्ट्रीय अभिमानाने दुमदुमत साजरा झाला.

कार्यक्रमाने संविधानाचे मूल्य, समतेची ज्योत आणि लोकशाहीची ओळख पुन्हा एकदा उजळवली.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रामदास शिंदे यांनी भूषविले. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व त्रिसरण पंचशील पठणाने कार्यक्रमाला पवित्र, अनुशासित आणि प्रेरणादायी प्रारंभ मिळाला. त्यानंतर उपस्थितांनी एकदिलाने, एकसुरात संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून राष्ट्रनिष्ठा आणि समानतेचे वचन उजाळले. सुस्पष्ट आणि विधायक विचार यांच्या माध्यमातून संदेश पवार यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित भारतीय विद्यार्थी मोर्चा महाराष्ट्र अध्यक्ष मा.जितेंद्र भोसले सर यांनी संविधानाची गरज, त्याची जडणघडण, आणि आजच्या समाजातील त्याचे महत्व यावर प्रभावी, थेट मनाला




भिडणारे मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये संविधानाप्रती जागरूकता आणि कर्तव्यभावना अधिक दृढ झाली.

संविधान दिनानिमित्त एन. के. जगताप, विशाखा शिंदे आणि राम लोखंडे यांनी शुभेच्छा पर मनोगत व्यक्त करत संविधानाचा प्रकाश घराघरांत पोहचण्याचे आवाहन केले.भावपूर्ण आणि प्रेरक अशा संविधान गीताचे गायन जे. के. गायकवाड यांनी करून कार्यक्रमाला सांस्कृतिक आणि राष्ट्रभावनेची उंची दिली.

कार्यक्रमाची सुरेख मांडणी आणि आकर्षक सूत्रसंचालन सुरेंद्र शेलार यांनी केले.आभार प्रदर्शन यश जसवलकर यांनी केले.कार्यक्रमासाठी ध्वनिक्षेपक व्यवस्था विठ्ठल जगताप यांनी केली,तर अल्पोपहाराची रुचकर सोय अश्विनी साळवी यांनी केली.

या कार्यक्रमाला गणपत जगताप, नरेश मोरे, मधुकर नाक्ते, महादेव जगताप, महादेव जाधव, महादेव गवाणे, भास्कर गवाणे, मनीषा गायकवाड, अनिषा जगताप, सविता शिंदे, मीना नाक्ते, महिमा जसवालकर, सुवर्णा कांबळे, सुजाता साळवे तसेच दोन्ही संस्थांतील मान्यवर महिला-पुरुष आणि संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांच्या मूल्यांची अनुभूती देत ७६ वा संविधान दिन तळा येथे अविस्मरणीय, प्रेरणादायी व दिमाखदार वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.




# मोगरे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार संदीप रामचंद्र शेमणकर यांना "कोकणरत्न" पदवी पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**

**राजापूर (प्रमोद तरळ)** : राजापूर तालुक्यातील आडिवरे परिसरातील मौजे मोगरे गावचे सुपुत्र, रुग्ण सेवक,आरोग्य मित्र, सामाजिक कार्यकर्ते, संतोष प्रतिष्ठान (रजि.) चे सदस्य, अर्धांगिनी एक पूर्णतः त्व फाऊंडेशनचे सदस्य राजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांना संतोष प्रतिष्ठान च्या माध्यमातून संगणक मोफत



मिळवून देणारे, जिल्हा परिषद शाळांना शैक्षणिक साहित्य मिळवून देणार, रुग्णांना मोफत रक्त पुरवठा करणारे, आदी विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी,आरोग्य शासकीय योजनेचे अभ्यासक, रुग्णांना शासकीय सेवेतून मदत करत, सर्जरी व डोळ्याचे कित्तेक रुग्णांना मोफत ऑपरेशन करून देणारे, विविध सामाजिक संस्था कडून पुरस्कार मिळालेले, पत्रकार,संपादक, श्री. संदीप रामचंद्र शेमणकर यांच्या कार्याची दखल घेत स्वतंत्र कोकणराज्य अभियानतर्फे "कोकणरत्न" पदवी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे सदर पुरस्कार शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी. सायंकाळी ४ ते ६ या वेळेत मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान जवळ येथे होणार आहे असे अभियानचे अध्यक्ष संजय कोकरे यांनी कळविले आहे

# सोनसाखळी चोरांचा महिलेवर हल्ला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** तळोजा परिसरात पायी चालणाऱ्या महिलेची सोनसाखळी दुचाकीवरून येणाऱ्या चोरट्यांनी महिलेवर हल्ला करून तिला फरफटवत नेत दागिने लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे .

चोरट्यांच्या या हल्ल्यात महिला जखमी झाली आहे. या घटनेतील ४७ वर्षीय महिला घरी द रोर फिटनेस क्लब ते बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेज या रस्त्यावरून जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी अचानक पायी चालत असलेल्या महिलेला लक्ष्य करत सोनसाखळी खेचण्याचा प्रयत्न केला. म

हिलेने विरोध केल्याने चोरट्यांनी सोनसाखळीला हिसकावले व ते पसार झाले .

# तुकाराम मुंढेंचा दणका : दिव्यांगांचा छळ कराल तर पाच वर्षे तुरुंगात जावे लागेल, दंडाधिकारी यांच्यावर दिव्यांगांच्या सुरक्षेची आता जबाबदारी

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : दिव्यांग व्यक्तींचे होणारे छळ, हिंसाचार आणि शोषणाच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांना प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले असून दिव्यांगाचा छळ करणाऱ्या दोषींना पाच वर्षे शिक्षा होवू शकते. त्यासदंर्भातला शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने गुरुवारी प्रसिद्ध केला. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये दिव्यांगांच्या शोषणाला प्रतिबंध व कारवाईच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती विकसित करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीद्वारे तक्रारींचे निवारण, तात्काळ कारवाई, संरक्षणात्मक उपाय, वैद्यकीय मदत, पुनर्वसन आणि कायदेशीर सहाय्य यासाठी स्पष्ट दिशा-निर्देश निश्चित केले आहेत. उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी हे दिव्यांग व्यक्तींवरील छळ, हिंसाचार आणि शोषणाच्या घटनांची दखल घेऊन त्वरित प्रतिबंधात्मक पावले उचलतील. पिडीत व्यक्तीचे संरक्षण, वैद्यकीय मदत आणि पुनर्वसन यासाठी आवश्यक मदत करतील. दिव्यांग व्यक्ती, त्यांचे प्रतिनिधी किंवा स्वयंसेवी संस्था या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करू शकणार आहेत. पोलिसांकडून दिव्यांगांच्या छळाबाबतची तक्रार संबंधित उपविभागीय किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे दाखल होईल. तसेच दंडाधिकारी स्वतःहून कारवाईही सुरू करू शकणार आहेत. तक्रार प्राप्त झाल्यानंतर पिडीतास सुरक्षा, वैद्यकीय मदत व पुनर्वसन सुविधा देण्याचे निर्देश दंडाधिकारी पोलिस तसेच प्रशासनाला देतील. त्याचबरोबर दंडाधिकारी सदर प्रकरण न्यायीक दंडाधिकारी यांच्याकडे वर्ग करु शकणार आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९२ नुसार, दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या छळ, हिंसाचार आणि शोषण करणाऱ्या व्यक्तींना किमान सहा महिने आणि कमाल पाच वर्षे कारावासाची शिक्षा तसेच दंडाची तरतूद आहे. मिस्टर क्लिन म्हणून ओळखले जाणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव आहेत. त्यांच्या २० वर्षात २४ बदल्या झाल्या आहेत. अडगळीतले पद म्हणून त्यांना दिव्यांग कल्याण विभाग देण्यात आला. मात्र त्यांनी या दुर्लक्षित विभागात उत्खनन सुरु केल्याने अनेकांची पंचाईत होणार आहे. मुंढे यांनी दुर्लक्षित विभागाला चर्चेत आणले आहे. दिव्यागांच्या राखीव जागांवर दिव्यांग असल्याचे बनावट प्रमाणपत्र घेवुन हजारोंनी सरकारी नोकऱ्या पटकावल्या आहेत.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# भारतीय मानवधिकार एसोशिएशन महाराष्ट्र राज्य शाखा संघटनेतर्फे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**ठाणे प्रतिनिधी गुरुनाथ तिरपणकर :** भारतीय संविधान दिन. सन २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान भारतीय संसदेत सादर झाले. त्या दिवसापासुन आजतागायत हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा होतो.

आज हा गौरवशाली ७६ वा संविधान वर्धापन दिन भारत सरकार नीती आयोग संचालित भारतीय मानवधिकार असोसिएशन संघटनेतर्फे विविध राज्यात जल्लोषात साजरा झाला. याच संघटनेच्या महाराष्ट्र राज्य संघटकानी ठाणे जिल्हा कोर्ट



येथे हा संविधान दिन गौरव कार्यक्रम आयोजित केला गेला.

याप्रसंगी सर्व उपस्थित पदाधिकारी व सदस्यांनी घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून संविधान शपथ घेतली. यानंतर सर्व सदस्यांनी भारतीय राज्यघटनेविषयी थोडक्यात आपले मनोगत व्यक्त केले.

प्रथम संघटनेच्या राज्यप्रशासकीय संरक्षण विभाग प्रमुख मिस्टर इम्रान बागवान (सध्या मुख्याध्यापक अंजुमन इस्लाम हायस्कूल घाटकोपर मुंबई येथे कार्यरत) यांनी यासंदर्भात बोलताना भारतीय राज्य घटनेतील कर्तव्य व जबाबदारी त्यांचे महत्त्व विषद केले. तर याच संघटनेच्या राज्य प्रशासकीय संरक्षण उपप्रमुख सौ. आरती कांबळे (सध्या समन्वयक सायबर क्राईम पोलीस स्टेशन ठाणे येथे कार्यरत) यांनी महिला व बालविकास संरक्षण संदर्भात घटनेला अनुसरून विशेष माहिती दिली. तसेच सौ. तन्वी चाळके मॅडम पोलीस संरक्षण कोकण विभाग प्रमुख यांनी सर्वसामान्यांना जाणवण्यार्या समस्या व याउपर कायदेशीर समाधान यांचे सविस्तर विश्लेषण केले.

मिंस्टर हुसैन मण्यार सामाजिक प्रमुख संरक्षण कोकण विभाग यांनी संविधान हा लोकशाहीचा श्वास व जनतेचा विश्वास आहे असे म्हटले. या घटनेतील मुलभूत बाबी जपण्यासाठी लोकशाहीचे स्तंभ व लाभार्थी यामध्ये आपली भारतीय मानवधिकार संघटना ही दुवा आहे, म्हणूनच हे माध्यम अधिक घट्ट झाले पाहिजे. तर सौ. सोनावणे मॅडम उपप्रमुख सामाजिक संरक्षण कोकण विभाग यांनी घटनेतील विशेष तरतुदी व मानवी मुल्य यावर उत्तम भाष्य केले. जनसामान्यांना भेडसावण्यार्या प्रत्येक समस्यांवर उत्तर संविधानात आहे. फक्त ते शोधण्यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे.

याच संघटनेच्या राज्य आर्थिक विभाग प्रमुख पदी नुकतीच श्री गजानन फडकले यांची निवड करण्यात आली. यावेळी त्यांनी ही आपले मनोगत याद्वारे व्यक्त केले. ते म्हणाले आपल्या देशात घटनेनुसार अनेक कायदे व नियम बनवले गेले आहेत. परंतु योग्य अंमलबजावणी अभावी या कायद्याचा लाभ दुर्बल शोषित वंचिताना मिळत नाही, किंबहुना या ज्ञान माहिती अभावी त्यांचे शोषण होते. तसेच कधीकधी ते शासन प्रशासन बलदंडापुढे हतबल ठरते. अशावेळी त्यांना न्याय देण्यासाठी सर्व जागरूक नागरिक सामाजिक संस्था व NGO यांनी पुढे आले पाहिजे. भारतीय मानवधिकार असोसिएशन यासाठी विशेष पुढाकार घेत आहे त्याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक. भविष्यात हे अधिक व्यापक होण्यासाठी विस्तृत जनजागृती व कृतिशील कार्यशैली व विविध उपक्रमांवर संघटनेचा भर असेल, जेणेकरून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत याचा लाभ पोहोचेल.यावेळी अन्य नवनियुक्त सदस्य श्री जंगम साहेब, मिस्टर शेख साहेब व सोनी साहेब व अन्य स्वयंसेवक उपस्थित होते. या सभारंभ शेवटी मिस्टर बागवान साहेबांचा आभारप्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## संविधान दिनानिमित्त पालोदकर महाविद्यालयात मूल्याधारित उपक्रमाचे केले आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सिल्लोड (योगेश पालोदकर)** : भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात मूल्याधारित उपक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी शालेय परिपाठाच्या वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संविधान प्रस्तावनेचे वाचन, संविधान व्याख्यानमाला, संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा, संविधान विषयक बालविवाह प्रतिबंधक नाटिका अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्वाची जाणीव, सामाजिक जबाबदारी,



सहकार्य, सामाजिक संवेदनशीलता आणि लोकशाही मूल्यांची दृढ स्थापना होईल. परिणामी संविधान दिन हा मूल्याधिष्ठित शिक्षणाचा अनुभव देणारा प्रभावी दिवस ठरेल.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, राजेश ठोंबरे, सुनील सागरे, प्रफुल्ल कळम, योगेश निंभोरे, राजाभाऊ भोसले, भास्कर केरले, गजानन सपकाळ, विक्की चांदुरकर, डॉ रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे, जयश्री चापे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांनी परिश्रम घेतले.

# महसूलमंत्री बावनकुळे यांच्या सभेमुळे मतदारांचा भाजपा उमेदवारांना वाढता प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**रिसोड (रणजित ठाकूर)** : रिसोड नगर परिषद निवडणूक प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरु झाली आहे. भारतीय जनता पार्टी माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या नेतृत्वात नगर परिषद निवडणूक लढवीत आहेत. अनंतराव देशमुख यांची मागील अनेक वर्षांपासून नगर परिषदेवर एक हाती सत्ता राहली आहे. मागच्या नगर परिषद निवडणुकीत अनंतराव देशमुख भाजपात नव्हते त्यांनी जनविकास आघाडीच्या बॅनर खाली निवडणूक लढवून राजकीय पक्षांना धूळ चारत



मोठया मताधिक्याने विजय मिळविला होता.आता भाजपात असल्यामुळे ही निवडणूक अनंतराव देशमुख यांच्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावणारी ठरणार आहे. आपला नागराध्य व्हावा यासाठी त्यांच्याकडून अतिशय सावध पवित्रा घेतला जात आहे.शक्य वाटत नसताना त्यांनी शिवसेनेच्या नेत्या भावना गवळी यांच्याशी तडजोड करून केलेली युती ही फार महत्वाची ठरली आहे. सध्या रिसोड करांचा सर्वाधिक विश्वास भावना गवळी यांच्यावर आहे त्यामुळे महायुतीला विजयाकडे जाणारा मार्ग सुकर झाला आहे. तर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासाठी रिसोड शहरातील प्रतिष्ठित नागरिक तथा जेष्ठ नेते भगवानराव क्षीरसागर यांना उमेदवारी जाहीर करून मतदारांना सक्षम पर्याय दिला आहे. भगवानराव क्षीरसागर हे धार्मिक प्रवृत्तीचे व सर्व जाती धर्मातील लोकांशी त्यांचे अतिशय सलोख्याचे संबंध आहेत.भगवानराव क्षीरसागर यांचे जेष्ठ पुत्र किरण क्षीरसागर व त्यांच्या धाकट्या सुनबाई भारती अरुण क्षीरसागर हे दोघे नगराध्यक्ष राहलेले आहेत त्यामुळे त्यांना पद सांभाळण्याचा दीर्घ अनुभव आहे त्याचा फायदा भगवानराव क्षीरसागर यांना होईल. तर महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रचाराची सभा झाल्यामुळे मतदारांमध्ये भाजपा विषयी सहानुभूतीची लाट पसरली आहे. बावनकुळे यांनी निधी कमी पडू देणारं नाही फक्त भागवराव यांना नगराध्यक्ष करा अशी अट घातली आहे. त्यांच्या भाषणामुळे भाजपा वर मतदारांचा विश्वास अधिक घट्ट झाला आहे. सध्यातरी भाजपा ने प्रचारात आघाडी घेतली आहे.

# संविधान दिनानिमित्त धनज आश्रम शाळेत विविध स्पर्धांचा उत्साहपूर्ण समारंभ

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड (राजु गायकवाड) :** भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांमध्ये संविधानाचे महत्त्व रुजवण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात व्ही एस भाकरे यांनी अध्यक्षस्थान भुसवले होते यावेळी वक्तृत्व स्पर्धा 'भारतीय संविधानाचे महत्त्व' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानातील योगदान' या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी मते मांडली सोबतच



निबंध लेखन स्पर्धा 'संविधानातील मूलभूत कर्तव्ये' या विषयावर विद्यार्थ्यांनी लेखन केले निबंध स्पर्धेत संविधानाची उद्देशिका (Preamble), राष्ट्रीय प्रतीके आणि लोकशाही मूल्यांवर आधारित रांगोळी काढण्यात आल्या.

या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समानता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता या संविधानिक मूल्यांची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच,त्यांना भारतीय नागरिक म्हणून त्यांचे हक्क व कर्तव्ये समजावीत, हा या आयोजनामागील मुख्य उद्देश होता.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के. एन. भगत यांनी केले.

## शासकीय वसतिगृहाच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता – आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला–मुलींसाठी "संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजने" अंतर्गत शिरूर कासार तालुक्यातील मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळवून देण्याच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नातून अनेक विद्यार्थ्यांची निवासाची सोय उपलब्ध होणार आहे.

तालुक्यातील वारणी येथे मुलांच्या वसतिगृहासह मुलींचे वसतिगृह उभारण्याची आवश्यकता तातडीची असून, त्यासाठी सुरेश धस यांनी मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, बीड यांना सविस्तर माहिती देऊन अधिकृत पत्राद्वारे मागणी सादर केली होती. ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर बाहेर पडणारे स्थलांतर व परिसरातील आयडियल इंग्लिश स्कूल, मॉडर्न इंग्लिश स्कूल, केशवराज माध्यमिक विद्यालय, राजीव गांधी महाविद्यालय, संत वामनभाऊ विद्यालय, शासकीय ITI यांसारख्या महत्वाच्या शैक्षणिक संस्था लक्षात घेता या वसतिगृहाची गरज पोहचवली सातत्याने शासनापर्यंत पोहोचवली जात होती. महाराष्ट्र शासन – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने

**शिरूर कासार तालुक्यातील मुलींसाठी हे वसतिगृह म्हणजे शिक्षणाच्या संधींची नवी दिशा ठरणार आहे. हा निर्णय ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांसाठी मोठा दिलासा व समाजकल्याणाच्या दिशेने महत्वाची पायरी आहे.**

₹ 13.79 कोटी किंमतीच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे, ही अत्यंत समाधानाची आणि ऊसतोड कामगारांच्या मुलींसाठी ऐतिहासिक बाब आहे. ऊसतोड कामगारांच्या मुला–मुलींचे शिक्षण अबाधित राहावे, त्यांना सुरक्षित व गुणवत्तायुक्त निवास सुविधा मिळाव्यात यासाठी आ. धस यांचे प्रयत्न चालूच आहेत.

## जालना–मंठा रोडवरील सायच्छा हॉटेलवर छापा; 04 आरोपी जेरबंद, 03 महिलांची सुटका

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा प्रतिनिधी जालना :** जालना ते मंठा रोडवरील रामनगर साखर कारखाना चौकातील सायच्छा हॉटेलमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, जालना यांनी मोठी कारवाई करीत छापा टाकला. या कारवाईत 04 पुरुष आरोपींना अटक करून 03 पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून आरोपींकडून एकूण ₹40,120/- रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. सदर हॉटेलचा मालक सुधाकर यादव हा आर्थिक फायद्यासाठी महिलांना वेश्याव्यवसायाकडे वळवून त्यांच्याकडून



अनैतिक काम करून घेत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी ठिकाणी धाड टाकताच हॉटेलमध्ये गैरप्रकार सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी हॉटेल मालक सुधाकर यादव, मॅनेजर ईश्वर गव्हाणव, दलाल पंडित काळू राठोड व अक्षय एकनाथ बुचुकल या चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले. पीडित महिलांना त्वरित सुरक्षित स्थळी हलवून त्यांचे समुपदेशन करण्यात येत आहे.आरोपींविरोधात महिलांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम 1956 अंतर्गत कलम 03, 04, 05 व 06 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सामाजिक कार्यकर्ते राजकुमार भगत यांचा भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड (राजु गायकवाड)** : दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त भीम आर्मी पुसद टीमतर्फे आयोजित संविधान सन्मान सभा उत्साहात संपन्न झाली. या सन्मान सभेत गुणवंत विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था, बेलोरा ता. पुसद, जि. यवतमाळ चे अध्यक्ष राजकुमार भगत यांचा संविधान प्रत व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून



ॲड. आशिषभाऊ देशमुख सदस्य, बार कौन्सिल ऑफ इंडिया यांनी कार्यभार सांभाळला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संजय दांडे मुख्याध्यापक, ज्युनियर कॉलेज गहुली, डॉ. राहुल भगत, आयु. मिलिंद जाधव अध्यक्ष, धम्मक्रांती प्रज्ञापर्व २०२५ तर संविधान सन्मान सभा चे आयोजक अशोकभाऊ भालेराव जिल्हाध्यक्ष, भीम आर्मी यवतमाळ, अजय लोखंडे तालुका अध्यक्ष, भीम आर्मी पुसद, वैभव सूर्यवंशी (उपाध्यक्ष, भीम आर्मी पुसद) प्रा. कल्याण साखरकर, भारत कांबळे तालुका अध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा पुसद, हे मान्यवर मंचावर उपस्थित होते.संविधानाचे मूल्य समाजात पोहोचावे, संविधानिक कर्तव्यांची जाणीव निर्माण व्हावी आणि सामाजिक उपक्रमात पुढाकार घेणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश या सभेमागे होता.सन्मान स्वीकारताना राजकुमार भगत म्हणाले,"संविधान दिनाच्या दिवशी मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद असून यामुळे सामाजिक कार्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली."कार्यक्रमाला भीम आर्मीचे पदाधिकारी, विद्यार्थी, विविध संस्थांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मौजे वालूर येथे सकाळी ६ ते ८ दरम्यान वीज लोडशेडिंग बंद करण्याची पालक–विद्यार्थ्यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**सेलू (शिवाजी पवार)** : मौजे वालूर (ता. सेलू, जि. परभणी) येथील विद्यार्थ्यांना सकाळच्या अभ्यासावेळी व कोचिंग क्लासेसला जाताना होणाऱ्या वीज खंडिततेमुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची तक्रार पालक व विद्यार्थ्यांनी केली आहे. यासंदर्भात संबंधितांनी महावितरणच्या कनिष्ठ अभियंता कार्यालयाकडे लेखी निवेदन देऊन सकाळी ६.०० ते ८.०० या वेळेत होणारे वीज लोडशेडिंग तातडीने बंद करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मौजे वालूरमधील अनेक विद्यार्थी सकाळच्या सत्रात कोचिंग क्लासेसला जातात. मात्र, त्या वेळेतच वीजपुरवठा खंडित असल्याने अभ्यासात अडथळे निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांना अंधारातच क्लासेसला जावे लागत असल्याने शिकवणीचे वेळापत्रकही विस्कळीत होत असल्याची तक्रार निवेदनात करण्यात आली आहे.

यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत असून, शिक्षणात मागे पडण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता सकाळी वीजपुरवठा सुरळीत ठेवावा तसेच सदर वेळेत वालूर गावठाणात सिंगल फेज लाईटचा पुरवठा अखंडित ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

अन्यथा नाईलाजास्तव मौजे वालूर येथील विद्यार्थी व पालकांच्या वतीने ३३ केव्ही उपकेंद्रासमोर उपोषणास बसण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.निवेदनावर बालाजी हरकळ, ॲड. संदीप डाके, सिद्धांत सिंगारे, निसार शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## "श्रीवर्धनच्या विकासाचा चेहरा बदलणारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) 'फ्रंटफूट'वर; नगराध्यक्ष पदासाठी चर्चा चांगलीच तापली!"

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन (अनिकेत मोहित)** : श्रीवर्धन नगरपालिकेच्या निवडणुकीसाठीचे राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत आहे. सर्वच पक्षांनी आपल्या उमेदवाराला 'भावी नगराध्यक्ष' म्हणून उभं केल्याने चुरस तीव्र झाली असली, तरी शहरभर मात्र एक नाव गाजत आहे—माजी नगराध्यक्ष श्री. जितेंद्र सातनाक!मागील वीस वर्षांत श्रीवर्धनचा चेहरामोहरा बदलणाऱ्या विकासकामांच्या आधारावर सत्ताधारी पक्ष शहरामध्ये प्रचार करत आहे. 20 वर्षांपूर्वीचा श्रीवर्धन आणि आजचा आधुनिक, विस्तृत, सोयीसुविधांनी युक्त



श्रीवर्धन—या दोन्ही काळातील बदलांच्या तुलनेत सातनाक यांच्या नेतृत्वाने शहराला नवे अध्याय दिल्याची भावना जनतेत दिसून येते.रस्ते-विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीजव्यवस्था, पर्यटनवाढ, तसेच शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झालेली ठोस पावले नागरिकांच्या स्मरणात आजही ताजी आहेत. त्यामुळेच "या वेळीही नगराध्यक्षपदाचे पारडे सातनाक यांच्या दिशेने झुकतेय" अशी चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरीत आहे. अनेक प्रभागामध्ये सध्या प्रचाराला जोर आला असून उमदेवार आणि कार्यकर्ते यांचा उत्साह पहायला मिळत आहे. याचबरोबर, खासदार सुनीलजी तटकरे आणि आमदार आदितीताई तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) ने केलेली नियोजनबद्ध कामगिरी जनतेत विश्वास निर्माण करत आहे. जाणकारांच्या मते, श्रीवर्धनची समजूतदार जनता यावर्षीही विकासाला अग्रक्रम देत एकहाती सत्ता देईल, अशी मजबूत शक्यता निर्माण झाली आहे.

## थोडक्यात

### एक लाख 12 हजारांची ऑनलाईन फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : जुने वापरते फ्रिज विकत घेण्याचा बनाव करून खोटी माहिती देऊन वेगवेगळे स्कॅनर पाठवले आणि एक लाख 12 हजारांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 23 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रितिका अलुवालिया या कामोठे, सेक्टर 34 येथे राहत असून त्यांनी घरातील जुने फ्रिज विक्रीसाठी ओएलएक्स या सोशल मीडियावर टाकले. त्यावेळी त्यांना समोरील इसमाने यांचे नाव संजय कुमार असून खारघर येथे फर्निचरचे दुकान असल्याचे सांगितले. आणि क्यू आर कोड पाठवतो, गुगल पे मधून स्कॅन करा आणि तुम्हाला पाच रुपये येतील असे सांगितले. ती प्रोसेस केल्यानंतर पाच रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले. पुन्हा समोरील इसमाने शंभर रुपये पाठवले. यावेळी पुन्हा एक स्कॅनर पाठवला. तो स्कॅन केला असता रितिका यांच्या आईच्या खात्यातून 14 हजार 500 वजा झाले. त्यानंतर पुन्हा स्कॅन करा असे सांगितले असता त्यांच्या आणि आईच्या खात्यातून एकूण एक लाख 12 हजार तीनशे रुपये वजा झाले.

### सोन्याची चैन आणि पेंडंटची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** :रोलिंग लाऊड कॉन्सर्ट या कार्यक्रमात असताना अनोळखी इसमाने सोन्याची चैन आणि पेंडंट जबरदस्तीने ओढून चोरी केल्याप्रकरणी आरोपी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 22 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.अद्वेद पिल्लाई हे मालाड येथे राहत असून ते 22 नोव्हेंबर रोजी रोलिंग लाऊड कॉन्सर्ट या कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी त्यांच्या गळयातील सोन्याची चैन अज्ञाताने ओढून चोरी करून नेली तसेच ज्योतिरादित्य मोरे यांच्या गळयातील अकरा ग्रामची चैन आणि पेंडंट अज्ञाताने चोरी केले. संवेद बलसारा याची 15 ग्राम वजनाची सोन्याची चैन चोरून नेली. तसेच समर्थ शेट्टी, हृदय नाईक, कौन्सिल रवी देसूल, यश देवरे यांच्या देखील गळयातील सोन्याची चैन असा एकूण 15 ते 16 लाखांच्या सोन्याची चैन चोरून नेण्यात आले.

### 32 तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 32 तोळे वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमा विरोधात २५ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.आयेशा बेग या रोहिंजन गाव येथे राहत असून 20 नोव्हेंबर रोजी त्यांनी कपाटातील ड्रॉवरमध्ये ठेवलेले दागिने घालण्यासाठी पाहिले असता त्यात दागिने नव्हते. दागिन्यांचा इतरत्र शोध घेतला मात्र सापडून आलेला नाही. त्यांच्या घराचा कडीकोयंडा किंवा दरवाज्याचा कोणताही भाग तुटला नसल्याने त्यांनी अनोळखी ईसमा विरोधात गुन्हा दाखल केला.

### इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** राहत्या घरातून कोणालाही काहीही न सांगता एक इसम कोठेतरी निघुन गेले ते अदयापपावेतो घरी परत आली नाही . म्हणून ते हरविल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे . कैलास राजभर वय ४२ रा. देवीचा पाडा , हे असून त्यांचा रंग-सावळा, बाधा-सडपातळ, चेहरा-उभट, नाक-टोकदार, केस काळे लहान, अंगात नेसुससे रंगाचा फुल बाड्यांचा शर्ट व ग्रे रंगाची फुल पेंट, काळया रंगाचा शुज घातलेला आहे . या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा पो.हवा राजेंद्र साळुंखे यांच्याशी संपर्क साधावा .

### सोन्याची चेन आणि पेंडण्टची चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** खारघर येथे रोलिंग लाऊड कॉन्सर्ट या कार्यक्रमात असताना अनोळखी इसमाने सोन्याची चेन आणि पेंडण्ट जबरदस्तीने ओढून चोरी केल्याप्रकरणी आरोपीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्वेद पिल्लाई हे मालाड येथे राहत असून, ते रोलिंग लाऊड कॉन्सर्ट या कार्यक्रमासाठी खारघर येथे आले होते.

या वेळी त्यांच्या गळयातील सोन्याची चेन अज्ञाताने ओढून चोरी करून नेली तसेच ज्योतिरादित्य मोरे यांच्या गळयातील ११ ग्रामची चेन आणि पेंडण्ट अज्ञाताने चोरी केले. संवेद बलसारा याची १५ ग्राम वजनाची सोन्याची चेन चोरून नेली. तसेच समर्थ शेट्टी, हृदय नाईक, कौन्सिल रवी देसूल, यश देवरे यांच्या देखील गळयातील सोन्याची चेन असा एकूण १५ ते १६ लाखांचा सोन्याचा ऐवज चोरट्यांनी लांबवला.

# श्री समर्थ विद्यालयात ५३ वी तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे थाटात उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी -महेश पेन्दोर :** घाटंजी मध्ये श्री समर्थ विद्यालयाच्या वतीने आयोजित ५३ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी मोठ्या उत्साहात उद्घाटन झाले. विज्ञानाची ओळख, अनुप्रयोग आणि संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करणे या उद्देशाने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रदर्शनाला यंदाही उत्तम प्रतिसाद मिळाला. या विज्ञान प्रदर्शनी मधे घाटंजी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या ९२ शाळा सहभागी होणार आहे. उद्घाटन दीनी प्राथमिक गटातून



३७ तर माध्यमिक गटातून २५ तसेच स्थानिक समर्थ शाळेतील ४ विद्यार्थी वर्गानी विविध विषयावर आधारीत प्रयोग सादर केली.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून प्रदर्शनीचे उद्घाटन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विज्ञान मॉडेल्सची पाहणी करताना पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेची प्रशंसा केली. विविध शाळेमधील निवडक विद्यार्थी 'ऊर्जा संवर्धन', 'जैवविविधता', 'स्मार्ट व्हिलेज', 'हवामान बदल', 'कृत्रिम बुद्धिमत्ता', 'हरित तंत्रज्ञान' अशा विविध विषयांवर आधारित मॉडेल्स घेऊन प्रदर्शनीत सहभागी झाले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रात्यक्षिकांमध्ये सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे, पाण्याचे व्यवस्थापन प्रणाली, स्वयंचलित शेती उपकरणे, डिजिटल सुरक्षा प्रणाली, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा यांसारख्या नाविन्यपूर्ण संकल्पनांनी सर्वांचे लक्ष वेधले. शिक्षक व मार्गदर्शकांचे देखील या प्रदर्शनाला मोठे योगदान लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणाले, "विज्ञान म्हणजे फक्त प्रयोगशाळेतील उपकरणे नाहीत, तर समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेली विचारसरणी आहे. विद्यार्थ्यांनी अशीच जिज्ञासा जोपासत पुढे जायला हवे. "प्रदर्शनीला पालक, विद्यार्थी आणि नागरिक यांचाही मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पाहुण्यांनी प्रत्येक स्टॉलला भेट देत विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. उत्तम मॉडेल्सची निवड करून त्यांना जिल्हा स्तरावर पाठविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन करण्यात आले. तालुका स्तरावर विज्ञानाची गोडी वाढवत विद्यार्थ्यांना संशोधनाची प्रेरणा देणाऱ्या या प्रदर्शनीचे उद्घाटन यशस्वीरीत्या पार पडले.

## चोभा निमगाव परिसरातील पुरात वाहून गेलेले विजेचे पोल दोन महिने झाले तरी नादुरुस्तच

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी (मारुती सत्रे) :** तालुक्यातील अनेक गावांमध्ये सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे व पुरामुळे अतोनात नुकसान झाले आहे.यात अनेक ठिकाणी विजेचे खांब पुरामुळे वाहून गेल्याने वीज पुरवठा बंद आहे. आता दोन महिने झाले तरीही चोभा निमगाव परिसरातील विजेच्या तारा व खांबांची दुरुस्ती न झाल्यामुळे शेतकरी वर्गावर महावितरणने पुन्हा नवे संकट उभे केले आहे.

सप्टेंबर 2025 महिन्यात कांबळी नदीला दोन वेळा



आलेल्या महापुरामुळे नांदा आणि निमगाव चोभा परिसरातील नदीकाठची सर्व पिके वाहून गेली. सोबत विजेचे खांबही वाहून गेले. या परिसरात जोशी मळा (निमगाव चोभा) हद्दीतील डीपीवरून छगन बनसोडे ( नांदा) यांच्या विहिरीपर्यंतचे 8 खांब आणि तारा वाहून गेल्या.या परिसरात 7 विहिरी असून, जवळजवळ 50 हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. खरीप पीक वाहून गेले असून, उरलेल्या पिकाला पाणी देता येत नाही. त्यामुळे रब्बीची पेरणीही थांबली आहे. परिसरातील शेतकरी वारंवार कडा, आष्टी येथील महावितरण कार्यालयात पाठपुरावा करत आहेत, परंतु त्याची दखल घेतली जात नाही.येत्या चार दिवसात विजेची समस्या न सोडल्यास शेतकरी महावितरण कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**कल्याण :** ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आज, दि.२६ नोव्हेंबर, २०२५ रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील समिती सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

यानिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी संविधान दिनाचे महत्त्व, भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये आणि लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका याबाबत मार्गदर्शन करून संविधानातील मूल्ये आचरणात आणण्याविषयी त्याचबरोबर आपापल्या कार्यक्षेत्रात पारदर्शकता व



जबाबदारी बाळगण्याचे आवाहन केले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शशिकांत गायकवाड, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) वरूणकुमार सहारे, जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले, तहसिलदार सचिन चौधर, संदीप भोसले, अमोल कदम, नायब तहसिलदार किशोर जाधव, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## गुन्हे शाखा कक्ष 3 कडून दोन सराईत घरफोडी करणारे गुन्हेगार जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : कळंबोली वसाहतीस संपूर्ण महाराष्ट्रत वेगवेगळ्या ठिकाणी घरफोडी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा कक्ष 3 ने जेरबंद केल्याने मोठ्या प्रमाणात अनेक घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्यास मदत होणार आहे. कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी झाल्याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष 3 चे सहाय्यक पोलीस निरीक्षक नांदरे, पोलीस उपनिरीक्षक अभय शिंदे आणि पथक तांत्रिक तपास व गुप्तबातमीद्वारा आरोपींचा शोध घेत असताना त्यांना सराईत गुन्हेगार सलीम मोहम्मद शेख वय 37 वर्षे रा. दापोली व तौफिक मोहम्मद शेख वय 32 वर्षे रा. चिकोडी कर्नाटक यांची माहिती मिळाल्याने त्यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्या विरुद्ध मोठ्याप्रमाणात विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत . याबाबत पुढील तपास कळंबोली पोलीस करीत आहेत .

## रोडपाली सिग्नल जवळ झालेल्या अपघातात दुसरीमध्ये शिकणाऱ्या मुलाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेल जवळील रोडपाली सिग्नल येथे आठ रस्ते एकमेकांना मिळत असल्याने सिग्नल सुटण्यापूर्वीच अनेक वाहनांची येथे स्पर्धा होते याच स्पर्धेतून एका बालकाला त्यांचे प्राण गमवावे लागले आहेत. अपघाताची ही गंभीर घटना रोडपाली सिग्नलवर घडली.या भिषण अपघातामध्ये ट्रेलरच्या चाकाखाली नऊ वर्षच्या बालकाचे डोके चिरडल्याने तो जागीच ठार झाला. वडीलांसोबत हा मुलगा स्कूटीवरून जात होता.तळोजा फेज २ येथील शुभ इनक्लेव्ह या सोसायटीत राहणारे ४३ वर्षीय सुनील पाकळे हे त्यांचा मुलगा शार्विल याला घेऊन शाळेत सोडण्यासाठी स्कूटीवरून रोडपाली बाजूकडे जात असताना ही घटना घडली. नावडे उड्डाणपुल ओलांडल्यानंतर कासाडी नदीचा पुल ओलांडल्यानंतर ते रोडपाली सिग्नल अगोदर ३० फूट अंतरावर हा अपघात घडला. रोडपाली सिग्नल गाठण्याच्या धांदलीत भरधाव वेगाने चाललेल्या ट्रेलर चालकाने डाव्या बाजूकडे न पाहता स्कूटीला ठोकर दिली. या ठोकरीत स्कूटीवरून चाललेले बापलेक रस्त्यावर कोसळले. अपघातामध्ये स्कूटीला ठोकर लागल्याचे समजूनही ट्रेलर चालकाने त्याच्याजवळील ट्रेलर थांबवला नाही. त्याने अजून ट्रेलर दामटवला. या दरम्यान ट्रेलरचे मागील चाक बालक शर्विल याच्या डोक्यावरून गेले. गंभीर जखमी झालेला शर्विलच्या या अपघातामध्ये प्राण गेले. शर्विल हा दूसरीत शिकणारा बालक होता. त्याचे वडील स्वता स्कूलव्हॅन चालक आहेत. रोडपाली येथील सुनिल यांनी त्यांची व्हॅन उभी केल्यामुळे त्या व्हॅनपर्यंत शर्विलला घेऊन ते स्कूटीने जात होते. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात २२ वर्षीय ट्रेलरचालक राजकरण वर्मा याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून त्याला ताब्यात घेतले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके अधिक तपास करीत आहेत.

## योगेश्वरी शुगर्स ऊस वाहतूक वाहनांना बसविले रिफ्लेक्टर - ॲड रोहित देशमुख

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे**

**पाथरी:-** तालुक्यातील लिंबा येथील योगेश्वरी शुगर्स इंडस्ट्रीज प्रा लि लक्ष्मी नगर लिंबा व परभणी पोलिस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने योगेश्वरी शुगर्सचा व्यवस्थापकीय संचालक रोहित भैय्या देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना साईटवर रस्ते अपघात रोखण्यासाठी सर्व ऊस वाहतूक वाहनांना रिफ्लेक्टर बसविण्यात आले व तसेच परभणी शहर वाहतूक पोलिस व पाथरी पोलिस ठाण्याच्या



वतीने यावेळी मार्गदर्शन करण्यात आले त्यामध्ये अपघात होऊ नये चालकांनी वाहन चालवितांना नशा करु नये वाहनांना रेडियम व रिफ्लेक्टर बसवावे तसेच रोडवर वाहने उभी करु नये गाण्याचा मोठा कर्णकर्कश आवाज करु नये अशी सूचना शहर वाहतूक शाखा व पाथरी पोलिस स्टेशन यांच्यामार्फत सुचना देण्यात आल्या यावेळी पाथरी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे परभणी शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक वामन बेले शहर वाहतूक शाखा परभणी पोलिस उपनिरीक्षक प्रकाश कुकडे योगेश्वरी शुगर्सचे व्यवस्थापकीय संचालक रोहित भैय्या देशमुख यांनी रस्ते अपघाताबाबत मार्गदर्शन केले व यावेळी सर्व वाहनांना रिफ्लेक्टर बसविण्यात आले त्यावेळी योगेश्वरी शुगर्सचा डेप्युटी जनरल मॅनेजर राजकुमार तौर बुलढाणा अर्बन बँक परभणी विभागीय व्यवस्थापक निशांत कोचर कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी तुकाराम झाडे सुरक्षा रक्षक अधिकारी गणेश वाघमारे केनयार्ड सुपारवायझर पवार स्वराज इंटरप्राईजेस ॲन्ड रिफ्लेक्टर सप्लायर सुरेश गिराम शरद विटेकर व यावेळी वाहतूक ठेकेदार तसेच वाहन चालक मालक यांची उपस्थिती होती

### सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** आयेशा बेग या रोहिंजन गाव येथे राहत असून, त्यांनी कपाटातील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले दागिने घालण्यासाठी पाहिले असता त्यात दागिने नव्हते.दागिन्यांचा इतरत्र शोध घेतला मात्र सापडून आलेला नाही.

त्यांच्या घराचा कडीकोयंडा किंवा दरवाज्याचा कोणताही भाग तुटला नसल्याचे निदर्शनास आले. आयेशा बेग यांचे ३२ तोळे वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

सोने चोरीच्या घटनांसह अन्य घरफोडीच्या घटनांमध्ये पनवेल, नवीन पनवेलमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे रहिवाशांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## पालोदमध्ये 'जागर संविधानाचा' कार्यक्रम उत्साहात संपन्न,मान्यवरांच्या मार्गदर्शनाने संविधान दिनाचा संदेश घरोघरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून सत्यशील संघटन पालोद यांनी आयोजित केलेल्या 'जागर संविधानाचा - पर्व पहिले' या संविधान जनजागृती आणि निबंध स्पर्धा बक्षीस वितरण सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला, यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून







सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे , फुले शाहू आंबेडकरी विचारवंत प्रा. राहुलकुमार ताठे, सेवानिवृत्त विभागीय निबंधक देविदास पालोदकर,सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर पारधे, प्रा. माया दायजे आणि आरोग्य अधिकारी शिंदे सर उपस्थित होते. त्यांनी संविधानाचे महत्त्व आणि नागरिकांवरील जबाबदाऱ्या यावर प्रकाश टाकत जनतेला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच नासेर पठाण, उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर, ग्रामसेवक जयदीप सुरूशे, तंटामुक्ती अध्यक्ष विष्णू दांडगे यांच्यासह देविदास सुरडकर, सिद्धार्थ सूर्यवंशी, सांडू दांडगे, युवराज वाकेकर, विलास दामोधर, संतोष दांडगे, सतिश बिरारे, पप्पू हुरणे, विजयानंद दांडगे, नारायण दांडगे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुषार दांडगे यांनी केले, तर प्रास्ताविक अनिल मोरे यांनी सादर केले. अविनाश दांडगे यांनी आभार प्रदर्शन करताना सर्व मान्यवर, प्रमुख पाहुणे, सहभागी विद्यार्थी आणि उपस्थित संविधानप्रेमी जनतेचे आभार मानले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# डॉ. विठ्ठल जाधव यांचा ‘आलं आभाळ भरून’ कवितासंग्रह अकरावी, बारावीच्या अभ्यासक्रमात




**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** येथील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या ‘आलं आभाळं भरून’ या बालकुमार कवितासंग्रहाची निवड पीएमश्री, समग्र शिक्षा योजना अंतर्गत शालेय ग्रंथालयांसाठी इयत्ता अकरावी आणि बारावीच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या या कवितासंग्रहाचा समावेश सन-२०२५ पासून होत आहे.डॉ.विठ्ठल जाधव हे तीस वर्षांहून अधिक काळ जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. बालसाहित्य विषयात पीएच्. डी पदवी प्राप्त असून त्यांच्या ‘पांढरा कावळा’ या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार (२०१२) लाभला आहे. बटाटीची धार (बाल कथासंग्रह), तिवढा, रानरांगूळ हे कथासंग्रह, गर्भकळा कवितासंग्रह, उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे दोन बालकविता संग्रह प्रकाशित आहेत. यासह मानवता व्हाऊचर लेखसंग्रह, एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य हा संशोधनपर समीक्षा ग्रंथ अशी दहा पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालकुमार साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नियतकालिके, आकाशवाणीवर साहित्य लेखनास स्थान मिळाले आहे. ‘आलं आभाळ भरून’ हा डॉ. जाधव यांचा कवितासंग्रह शासकीय शाळा, आश्रमशाळा यांमधून अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत मोफत अभ्यासता येणार आहे. निसर्ग, शेतीमाती, सामाजिक प्रश्न सोबतच देशभक्ती, वर्तमान समाजजीवन या विषयीच्या रचना या संग्रहात आहेत. या निवडीसाठी डॉ. जाधव यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# म्हसळा तालुक्यातील आंबा-काजू बागायतदारांना ‘हवामानआधारित विमा’चे संरक्षण झाले उपलब्ध

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा तालुका प्रतिनिधी शिरीष समेळ :** म्हसळा तालुक्यातील कृषी विभाग हा नेहमीच कोकणातील कृषी परंपरेचा महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. आंबा आणि काजूसारख्या बहुमूल्य बागायती पिकांवर म्हसळा तालुक्याची आर्थिक घडी अवलंबून आहे. मात्र बदलते हवामान, अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि चक्रीवादळांसारख्या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी सतत असुरक्षिततेत ढकलले जातात. या पार्श्वभूमीवर



हवामान आधारित फळपीक विमा योजना ही शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी आणि उत्पन्न स्थिर ठेवणारी अत्यंत महत्त्वाची योजना बनली आहे.

सन २०२४-२०२५ मध्ये शेतकऱ्यांनी आंबा/काजू हवामानआधारित फळपीक विमा योजना स्वीकारली, त्या शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची माहिती जाहीर करण्यात आली आहे. संबंधित वर्षाचा युनिव्हर्सल सॅम्पो विमा कंपनीमार्फत रायगड जिल्ह्याचा “ट्रिगर क्लेम” अधिकृत फळपीक विमा पोर्टलवर अपलोड झाला असून, म्हसळा तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांनी योग्य ती पुढील कार्यवाही तातडीने करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेची पूर्तता केल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या पात्रतेनुसार विम्याची रक्कम प्राप्त होणार आहे.यासोबतच, पुढील२०२५-२०२६ या हंगामासाठीही आंबा व काजू बागायतदारांनी या विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. विशेषतः बदलत्या हवामानाच्या अनिश्चिततेमुळे असे संरक्षण कवच अनिवार्य झाले आहे. या वर्षासाठी विमा भरण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर घोषित करण्यात आली असून, इच्छुक शेतकऱ्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत वाट न पाहता त्वरित नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. यामुळे आकस्मिक हवामान बदलामुळे होणाऱ्या संभाव्य आर्थिक नुकसानीपासून शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शनासाठी आणि प्रक्रियेबाबत कोणतीही माहिती मिळवण्यासाठी तालुक्यातील सहायक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय, म्हसळा येथे संपर्क साधण्याचे आवाहन दत्तात्रय गंगाराम शिंदे, तालुका कृषी अधिकारी, म्हसळा यांनी केले आहे.

# उरण नगरपरिषद निवडणुकीत घणाघाती आरोप-प्रत्यारोप: भावना घाणेकर यांची आमदार महेश बालदींवर तीव्र टीका

**दैनिक युवक आधार**

**सायली साळुंके / उरण प्रतिनिधी** : उरणच्या राजकारणात तापलेलं वातावरण आणखी तापलं आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीनंतर भावना घाणेकर यांनी उरणचे आमदार महेश बालदी यांच्यावर थेट आणि कठोर शब्दांत टीका करत नव्या चर्चेला तोंड फोडले आहे.

**महत्वाचे आरोप – काय म्हणाल्या भावना घाणेकर?**

नितेश राणे यांच्या वक्तव्यावर मौन:

उरणमध्ये यशश्री शिंदे यांच्या दुर्दैवी मृत्यूच्या घटनेवेळी मंत्री नितेश राणे यांनी मुस्लिम समाजाबद्दल वादग्रस्त विधान केले होते. या संवेदनशील प्रसंगी आमदार महेश बालदी यांनी कोणतीही बाजू न घेता मौन बाळगले, असा थेट आरोप घाणेकर यांनी केला.

“उरणची कन्या अपघाताने गेली… पण त्यानंतर समाजात फूट पाडणाऱ्या वक्तव्यांवर बालदी साहेबांनी एक शब्दही बोलला नाही,” असे त्या म्हणाल्या.

**उर्दूतील 'दावत' पत्रक:**



निवडणुकीच्या तोंडावर मुस्लिम मतांसाठी उर्दू भाषेत पत्रके छापून ‘दावत’चे आमंत्रण देत आहेत, हे केवळ राजकीय दिखावा असल्याची टीका घाणेकर यांनी जोरदारपणे नोंदवली.

**भाजपच्या धोरणांवरही प्रहार**

भावना घाणेकर यांनी आपल्या भाषणात भाजपवर सामाजिक फूट पाडण्याचा आरोप करताना म्हटले:

“बटेंगे तो कटेंगे — हा भाजपचा देशभर चाललेला खेळ आहे.”

“पण उरणमध्ये आम्हाला जुडेंगे तो बढेंगे ह्या विचाराने विकास साधायचा आहे. सर्व समाजांच्या एकतेनेच उरण पुढे जाईल.”

**प्रचार सभेतील वातावरण**

मस्जिद मोहल्ल्यात झालेल्या संयुक्त प्रचार सभेत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

**प्रमुख उपस्थिती:**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या युवा नेत्या मर्झिया पठाण

आमदार जितेंद्र आव्हाड, ज्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे जनतेशी थेट संवाद साधला विविध समविचारी पक्षांचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित मर्झिया पठाण यांनी आपल्या भाषणात “एकता, सौहार्द आणि सर्व धर्म समभाव” याचा संदेश दिला.

**बालदी यांच्या प्रतिक्रियेची उत्सुकता**

भावना घाणेकर यांच्या या आरोपांवर आमदार महेश बालदी किंवा भाजपकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.पुढील काही तासांत किंवा दिवसांत त्यांची भूमिका काय असणार, याकडे संपूर्ण उरणचे लक्ष लागले आहे

# लोकशाही मूल्यांचा जयघोष; म्हसळ्यात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ :** संविधान दिनानिमित्त म्हसळा शहरात बौद्ध समाज बौध्दजन पंचायत समिती, म्हसळा तथा भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखेच्या संयुक्त विद्यमाने संविधान गौरव दिन सोहळा उत्साहात पार पडला. भारताचे संविधान निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी शहरातून भव्य रॅली काढण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात शाहिर भिमराव सूर्यतळ यांच्या संविधानगीताने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. न्याय, स्वातंत्र्य, समता




आणि बंधुता या संविधानिक मूल्यांनी देशाची पायाभरणी केली असून त्या महान कार्याची आठवण ठेवत डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या प्रसंगी संविधान अभ्यासक प्रशांत गमरे, कार्यक्रमाध्यक्ष सुरेश जाधव, प्रांताधिकारी महेश पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे, तहसीलदार सचिन खाडे, पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, गटविकास अधिकारी माधव जाधव, नगरपंचायत मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत बिराजदार, वन अधिकारी पी. एम. पाटील, कृषी अधिकारी एस. डी. शिंदे, युवा उद्योजक सुशांत मोरे, समीर बनकर, सुरेश कुडेकर, महादेव पाटील, बबन मनवे, शहीद उकये, जमादार सर, सुर्यकांत तांबे, चंद्रकांत पवार, मनोहर तांबे, सुमित सावंत, शाहिर भिमराव सूर्यतळ, संतोष जाधव, शशिकांत शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील विविध गावांमधून आलेले ग्रामस्थ, महिला वर्ग तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. रॅलीदरम्यान पोलीस प्रशासनाने विशेष सहकार्य करून शिस्तबद्ध व्यवस्था राखली. संविधान मूल्यांची जाणीव समाजात दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# माहूर मध्ये संविधान वाचनासह शहिदांना श्रद्धांजली; संविधानाचे वाचन; मेणबत्ती प्रज्वलन करून अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर :प्रतिनिधी सय्यद ईसा :** 26/11 च्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या नागरिक, पोलीस आणि जवानांना माहूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संविधान वाचन कार्यक्रमही घेण्यात आला दरवर्षीप्रमाणे यंदाही हा कार्यक्रम नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक देविदास चोपडे म्हणाले, “शहीद झालेले वीर आपल्या मायभूमीसाठी सर्वोच्च बलिदान देऊन गेले आहेत. या हल्ल्याला




जरी १७ वर्षे झाली असली, तरी त्या वेदनादायी आठवणी आजही ताज्याच आहेत. शहिदांचे बलिदान कधीही व्यर्थ जाणार नाही.”राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष मेघराज जाधव म्हणाले, “दहशतवादाचा समूळ नाश करण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी दक्ष राहिले पाहिजे आणि समाज एकजुटीने काम करणे आवश्यक आहे.”या वेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी, माजी सभापती वसंत कपाटे, पद्मा गिऱ्हे, हाजी कादर दोसानी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. विनोद कांबळे यांनी संविधानाचे वाचन केले. कार्यक्रमास नगरसेवक विजय कामटकर, रफीक सौदागर, राजू सौंदलकर, आकाश कांबळे, निसार कुरेशी,रणधीर पाटील, इरफान शेख, सुमित खडसे, विक्रम राठोड, अफसर आली,सुमित खडसे,तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सरफराज दोसानी, ‘पॉवर ऑफ मिडिया’चे इलियास बावानी, राज ठाकूर, जयकुमार अडकीने, सिद्धार्थ तामगाडगे, सुरेखा तळळणकर, जयंत गिऱ्हे, अमजद पठाण वाईकर, अमित येवतीकर, राजू चव्हाण, इम्रान सुरय्या, आशू पठाण, डी. डी. चव्हाण, सुनील आडे, शुभम पराते, वाजीद शेख, करीम कुरेशी, सलीम शेख, सत्तार शेख, अल्ताफ शेख, शेख अयाज, विकास राठोड यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.दोन मिनिटे मौन पाळून शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.!

# घोसल्याची कन्या!; जयश्री युवरे बी.फार्मसी परीक्षेत प्रथम – समाजात गौरवाचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे** : तालुक्यातील घोसला गावातील शिवसेना ऊ.बा. ठा चे विभाग प्रमुख ज्ञानेश्वर युवरे यांचे पुतणी व घोसला गावाचे प्रगतिशील शेतकरी श्रावण युवरे यांची कन्या जयश्री श्रावण युवरे हिने पुण्यातील नामांकित डी.वाय.पाटील विद्यापीठातील बी.फार्मसी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवत आपल्या सोयगाव तालुक्यांचे व परिसराचे नाव उज्वल केले आहे. कु.जयश्री च्या या उल्लेखनीय यशाबद्दल मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपानदादा गव्हाडे पाटील,जिल्हाप्रमुख विजय काळे,विजय चौधरी व बाळू शिंदे यांनी भेट घेऊन तिचा सत्कार केला तसेच भावी करिअरसाठी शुभेच्छा दिल्या.

कु.जयश्री युवरे हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मेहनत, चिकाटी व अभ्यासू वृत्तीच्या जोरावर हा मान मिळवला असून तिच्या या यशामुळे घोसला परिसरात समाधान आणि




अभिमानाचे वातावरण आहे.या यशामागे घरच्यांचे मार्गदर्शन,शिक्षकांचे सहकार्य आणि जयश्री चा आत्मविश्वास कारणीभूत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.“जयश्री युवरे ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असून तिचे भवितव्य उज्ज्वल राहो,” अशा शुभेच्छा मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गावंडे व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.

# अयोध्यामध्ये धर्म ध्वज फडकवल्या बद्दल सणसर येथे लाडू वाटप

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर येथे चालू असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहात मंगळवारी संध्याकाळी विश्व हिंदू परिषद इंदापूर तालुका यांच्या वतीने तालुका अध्यक्ष बजरंग रायते यांच्या सुचनेतून लाडू वाटप करण्यात आले यावेळी बजरंग रायते यांनी धर्म ध्वजाबद्दल माहिती सांगण्यात आली अयोध्यामध्ये धर्म ध्वज हा हिंदू धर्मातील एक पवित्र प्रतीक आहे,जो भगवान,धर्म आणि दिव्य शक्तीचे प्रतिनिधित्व करत आहे.हे मंदिराच्या शिखरावर फडकवला असल्यामुळे आणि ते विजय,समृद्धि आणि शुभ संकेताचे प्रतीक मानले जात आहे. धर्म ध्वजाचे महत्व विजय आणि समृद्धिधर्म ध्वज विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे.दिव्य शक्ती हे दिव्य शक्तीचे प्रतिनिधित्व करते आणि मंदिराच्या परिसरात सकारात्मक ऊर्जा निर्माण करते.धर्माचे रक्षकधर्म ध्वज धर्माचे रक्षक मानले जाते आणि ते नकारात्मक



शक्तींपासून बचाव करते यावेळी धर्म ध्वजाचे रंग आणि चिन्ह याची माहिती रायते यांनी सांगितली धर्म ध्वजामध्ये रंग भगवा पिवळा किंवा लाल रंगाचे ध्वज वापरले जातात जे त्याग,शक्ति आणि पवित्रतेचे प्रतीक आहेत.चिन्हध्वजावर ॐ, सूर्य,कोविदार वृक्ष आणि गरुड चिन्हे असतात,जे आध्यात्मिक महत्व आहे.लाडू वाटपासाठी विश्व हिंदू परिषद इंदापूर तालुका अध्यक्ष बजरंग रायते सागर महाराज गुप्ते अभिजित निंबाळकर गणेश भोसले विशाल रायते शिवाजी काळे बापूराव निंबाळकर केशव भोईटे प्रवीण काळे पपू खाडे सचिन भोईटे आदी कार्यकर्ते व महिला वर्ग उपस्थित होते

# आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी कारवाई करा – नंदा म्हात्रे

**दैनिक युवक आधार**

**पेण,( दीपक लोके) :** नगरपालिका निवडणुकीदरम्यान २५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास पेण शहरातील पाय बीच रोड व स्टेट बँक सोनोग्राफी सेंटर जवळ पार्क केलेले डंपर व रोड रोलर यांच्यावर आमदार रवीशेठ पाटील, थेट नगराध्यक्ष उमेदवार प्रीतम पाटील आणि नगरसेवक उमेदवार अनिरुद्ध पाटील यांचे फोटो असलेले रंगीत बॅनर आढळून आल्याने त्यांच्यावर आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी कारवाई करावी अशी मागणी काँग्रेसच्या थेट नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार नंदा म्हात्रे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली असल्याची माहिती त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.२०२५ पेण नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक



२ डिसेंबर रोजी होत असून सत्ताधारी भाजप पक्षाने शहराच्या विकासाकडे पाठ फिरवून अनेक विकासात्मक कामे अर्धवट परिस्थितीत ठेवली आहेत. शहराच्या रस्त्यांची बिकट अवस्था पाहता शहर भकास केला आहे त्यामुळे मतदान मागण्याकरीता जनतेसमोर जात असताना अनेक जण त्यांना याबाबत विचारणा करत असल्यामुळे मतदारांची नाराजी दूर करण्यासाठी ते रात्रीचे रस्ते करण्याचे काम सुरू करत आहेत दि. २५ रोजी मध्यरात्री शहराच्या पाम बीच रोड येथे पार्क केलेले डंपर नंबर एमएच ०६, बीडब्ल्यू ७४५६ व स्टेट बँक सोनोग्राफी सेंटर जवळ रोड रोलर ज्याच्यावर नंबर नाही अशी वाहने उभी करून त्यावर आमदार रवीशेठ पाटील, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रीतम पाटील व नगरसेवक पदाचे उमेदवार अनिरुद्ध पाटील यांचे फोटो असलेले केबिन मधील बॅनर ठेवून रस्त्यांची कामे करत मतदारांना आकर्षित करण्याचा हेतू ठेवत असल्यामुळे हा आदर्श आचारसहिता भंग आहे. त्यामुळे संबंधितांवर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तसेच मुख्याधिकारी यांनी कारवाई करावी अशा मागणीचे तक्रारी पत्र उमेदवार नंदा म्हात्रे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे केली आहे.याबाबतचा अहवाल भरारी पथकाने सुद्धा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आचार संहिता उल्लंघनाबाबत दिला आहे.त्यामुळे त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल असे नंदा म्हात्रे यांनी शेवटी सांगितले.

# देशातील प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार देणारे संविधान डॉ बाबासाहेबानी दिले : आमदार प्रशांत ठाकूर

## रिपाई पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी केलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद








**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** भारताचे संविधान जगात अद्भुत आहे देशातील प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार देणारे संविधान डॉ बाबासाहेबानी लिहिले त्यानंतर जगभरात या संविधानाचा गौरव केला जातोय .बाबासाहेबानी देशाला दिलेल्या संविधानाबद्दल कृतज्ञता भावना केवळ दलित समाज करीत नसून सर्वच समाज करीत आहे .आज या संविधानाला ७५ वर्षे होत असून संविधानाच्या माध्यमातून देहशतील प्रत्येक नागरिकाला पुढे जाण्याचे बळ दिले आहे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ साली संविधान दिन हा देशभरात संविधान दिन साजरा केला पाहिजे अशी संकल्पना मांडली देशाचे केंद्रीय राज्य मंत्री रामदासजी आठवले यांनी मोदीजींनी देशाच्या विकासाठी जे जे निर्णय घेतेले त्यांना पाठिंबा दिला असल्याने आठवले साहेबांचे देखील या संविधान गौरव दिनाच्या निम्मिताने आभार आमदार ठाकूर यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी संविधान गौरव दिन व लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेल महानगर पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर नवीन पनवेल येथे आयोजित केले होते. या शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी ते बोलत होते या शिबिराला कामगारांचा मोठा प्रतिसाद लाभला .संविधान गौरव दिन व लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी पनवेल महानगर पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले होते .डोळे तपासणी ,सीबीसी ,इसीजि,कॅल्शियम तपासणी ,मधुमेह तपासणी ,हाडांचे आजार , तसेच मोफत मल्टीव्हिटॅमिन च्या औषधांसहित खोकला ,सर्दी ची औषधे मोफत वाटप करण्यात आली या आरोग्य शिबिराला कर्मचारी वर्गाचा मोठा प्रतिसाद लाभला .

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी संविधानाची गौरव गाथा जागविण्याचे निलेशजीनी या संविधान गौरव दिनानिमित्त आयोजन केल्याने त्यांचे अभिनंदन . जे पनवेल शहराची सेवा करता त्या पनवेल महानगर पालिका सफाई कर्मचाऱ्यांची सेवा आज निलेश सोनावणे मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून करीत असल्याने निलेश सोनावणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले .आज देशभरात संविधान गौरव दिनानिमित्त कार्यक्रम घेतले जात आहेत पनवेल मध्ये निलेश सोनावणे यांनी हा संविधान गौरव दिन आयोजित केल्याबाबदल त्यांचे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे विशेष अभिनंदन आमदार प्रश्नात ठाकूर यांनी केले .

३६५ दिवस ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता आपले शहर स्वछ सुंदर ठेवण्याची पनवेल शहराची सेवा करणाऱ्या साफसफाई करणाऱ्या पनवेल महानगर पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुदृढ रहावे, निरोगी रहावे याकरिता त्यांची वैद्यकीय तपासणी वेळेचे वेळी होणे गरजेचे आहे हा संकल्प मनाशी ठेवून निलेश सोनावणे यांनी या शिबिराचे आयोजन केले असल्याचे आपल्या प्रास्ताविकात म्हटले .

या कार्यक्रमात पनवेल महानगर पालिका जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे ,जिल्हा प्रवक्ते तथा पनवेल महानगर पालिका जिल्हा क्षेत्र कार्याध्यक्ष मोहन गायकवाड ,आधार हॉस्पिटलचे डॉ संतोष पांढरे ,माजी नगराध्यक्ष संदीप पाटील ,माजी नगरसेवक गणेश कडू ,आदींनी आपले मनोगत व्यक्त केले .या कार्यक्रमासाठी के आ बांठिया विद्यालयाचे प्राचार्य बी एस माळी, रिपाई खांदेश्वर शहर अध्यक्ष दिनेश जाधव , आधार हॉस्पिटल चे संचालक डॉ मिलिंद पराडकर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे विश्वस्त धावू पाटील ,विजय पाटील, मुकुंद कांबळे ,कल्पेश कांबळे, संदेश पाटील, मयूर गायकवाड ,विकेश पाटील ,दीपक भोपी ,संजय कांबळे ,आदींसह सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्तिथ होते ,या कार्यक्रमासाठी पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त वैभव विधाते , आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे ,अनिकेत जाधव आदींचे सहकार्य लाभले .

---

## परळच्या ऐतिहासिक वास्तूस राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळावा” – संविधान दिनानिमित्त जोरदार मागणी



**दैनिक युवक आधार**

**सहसंपादक मुकुंद कांबळे**

**मुंबई :** भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त मैत्री संस्था, उत्प्रेरक फाउंडेशन, जनहित फाउंडेशन आणि सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने परळ येथील बी. आय. टी. चाळ क्रमांक १ येथे भव्य, उत्साहवर्धक व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात “संविधान जागर कवी संमेलनाने” झाली. या संमेलनात मोहन जाधव, निशाताई जाधव, डॉ. संतोष कांबळे, निखिल मोंडूला आणि गुरुदत्त वाकदेकर यांनी प्रभावी कविता सादर केल्या, तर अमर काझी यांनी पोवाड्याद्वारे श्रोत्यांची मनं जिंकली. कवी संमेलनानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख सत्रास सुरुवात झाली.

प्रमुख अतिथी म्हणून शंकर लोखंडे (अध्यक्ष : डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा समिती), मोहन जाधव (कवी, लेखक व बाबुराव जाधव यांचे चिरंजीव) आणि निशाताई जाधव (माता रमाई यांच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध अभिनेत्री व सामाजिक कार्यकर्त्या) उपस्थित होते. तसेच अनिकेत मनोज संसारे (युवा नेते, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष) यांची विशेष उपस्थिती लाभली. कोषाध्यक्ष विजय पवार, सुमित संसारे व सहकारी; काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष सुशांत दोडमणी हे देखील उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्ष सुरज भोईर (अध्यक्ष : मैत्री संस्था) तर सूत्रसंचालन गुरुदत्त वाकदेकर यांनी प्रभावीपणे पार पाडले.

कार्यक्रमात अनिकेत मनोज संसारे यांनी आपल्या थेट, जाज्वल्य आणि मनाला भिडणाऱ्या भाषणातून अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांना स्पर्श केला. ते म्हणाले, “ही वास्तू आमच्या समाजाचे तीर्थक्षेत्र आहे. इथे बाबासाहेबांच्या अथक संघर्षाची बीजे रोवली गेली. फुले–शाहू–आंबेडकरी चळवळीच्या स्मारकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना दिसते, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. जिथे बाबासाहेब, रमाई व शाहू महाराज एका छताखाली आले— त्या ठिकाणी ‘राष्ट्रीय स्मारक’ दर्जा न मिळणे हा ऐतिहासिक अन्याय आहे. या वास्तूचा प्रेरणादायी इतिहास तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. मी आणि माझी संपूर्ण टीम या चळवळीस पूरक साथ देत, हजारो तरुणांना येथे आणून जागृती करण्याचे वचन देतो.”

यानंतर कार्यक्रमाची सांगता संविधान सरनामा अभिवाचनाने झाली. वाचनानंतर उपस्थितांनी बाबासाहेब ज्या घरात वास्तव्यास होते त्या पवित्र स्थळी जाऊन विनम्र अभिवादन केले. “राष्ट्रीय स्मारक” दर्जा मिळवण्यासाठी एकत्रितपणे लढण्याचा दृढ संकल्प व्यक्त करताना संपूर्ण वातावरण अधिकच प्रेरणादायी झाले. संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संतोष कांबळे, मुकुंद कांबळे, ॲड. सोपान बुडबाडकर, विनायक जवळेकर, विकास कदम आणि डॉ. प्रभाकर कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. संविधान दिनाच्या या पवित्र दिवशी परळची ऐतिहासिक वास्तू नवचैतन्याने उजळून निघाली. “राष्ट्रीय स्मारक” दर्जासाठीची मागणी अधिक जोरकस, सुसंघटित आणि प्रभावी पद्धतीने पुढे येत असल्याचे प्रकर्षाने जाणवले. अखेरीस “जय भारत… जय संविधान…!” या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला आणि संविधानप्रेमाचा उत्साह अधिक तेजस्वी झाला.

## जि. प. शाळा हणमंतगांव मध्ये 26 नोव्हेंबर भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला



**दैनिक युवक आधार**

**लोणी (प्रतिनिधी) :** ज्ञानेश्वर साबळे, भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून हनुमंतगावत जि. प. शाळा.येथे विविध सामाजिक घटकांच्या सहभागातून संविधान दिन उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मा. मुख्याध्यापक नवगिरे सर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करताना उपस्थित पालक नागरिकांनी व विद्यार्थी “समता, बंधुता आणि न्याय” या राष्ट्रमूल्यांप्रती निष्ठा व्यक्त केली. संविधानातील तत्त्वज्ञान आजही देशाच्या लोकशाही व्यवस्थेचे सामर्थ्य असल्याचे यावेळी विद्यार्थी व वक्त्यांनी आपल्या भाषणातून नमूद केले.

या कार्यक्रमाला मा. केंद्रप्रमुख कोळेकर साहेब, प्रवरा साखर कारखाना संचालक अशोक घोलप सर,एकलव्य सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर भाऊ अहिरे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पिंपळे, सौ. मनीषा माळी, उपसरपंच प्राजक्ता अनाप, सर्व ग्रामपंचायत सदस्य माजी सरपंच गोरक्षनाथ ब्राम्हणे, उत्तम घोलप, दलित पँथरचे शरद बनसोडे, सोसायटीचे व्हाईस चेअरमन भागवत ब्राम्हणे, सुकदेव पवार, सागर पिंपळे, रवींद्र पिंपळे,मच्छींद्र ब्राम्हणे, भास्कर ब्राम्हणे, भागवत कानडे, कैलास ब्राम्हणे, संदीप मेहेरे, रत्नाकर ब्राम्हणे,संदीप गावडे तसेच महिला सहभागी म्हणून लता ब्राम्हणे, ज्योती पिंपळे, मंगल पिंपळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्ते श्री राजेंद्र पिंपळे यांनी आपल्या भाषणात संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि सामाजिक समानतेची जाणीव प्रत्येकापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे सांगितले. आजच्या जलदगतीच्या युगात संविधानातील मूल्यांची जपणूक करणे ही केवळ शासनाची नव्हे तर नागरिकांचीही समान जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. यांनी सामाजिक न्याय, समान संधी आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढा यांसाठी संविधानाने दिलेले सामर्थ्य अधोरेखित करताना, बाबासाहेबांच्या आदर्शांना अनुसरून समाजातील प्रत्येक घटकांनी जागरूक राहण्याची गरज व्यक्त केली. संविधानाचे केवळ वाचन न करता त्यातील मूल्ये जीवनात उतरवली तरच खरी प्रगती साध्य होईल, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय एकलव्य सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर आहेरे यांनी ग्रामविकास, शिक्षण, महिलांचे सक्षमीकरण आणि युवकांना संविधानाबाबत जागरूक करण्यासाठी पुढील काळात विविध उपक्रम राबवण्याचे आश्वासन दिले. समाजातील ऐक्य, शांतता आणि समरसता टिकवण्यासाठी संविधान हा दीपस्तंभ असल्याचे त्यांनी गौरवपूर्ण शब्दात नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आले व तसेच संविधान दिनाची शपथ देण्यात आली. उपस्थितांनी राष्ट्रनिष्ठा, सामाजिक एकात्मता आणि समानतेच्या मार्गावर अवि रतपणे वाटचाल करण्याचे संकल्प केले. प्रेरणादायी संदेश, सामूहिक सहभाग आणि राष्ट्रभावनेने भारावलेल्या या कार्यक्रमामुळे हनुमंतगावात संविधानदिनाचा उत्साह विशेषत्वाने जाणवत होता.

---

## शेतकऱ्यांच्या पीक नोंदी तलाठ्या मार्फत करा :- परम मुसळे (शिवसेना तालुका प्रमुख)




**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम:-**कोणताही शासकीय लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांना सातबारा वर पीक पेरा नोंदणी आवश्यक आहे. पण बऱ्याचश्या शेतकऱ्यांचे पेरे अद्याप बाकी आहेत. वाशीम जिल्हाधिकार्यालया मार्फत 12 नोव्हेंबर ते 30नोव्हेंबर या वेळेत मुदत वाढ देण्यात आली होती पण सद्यस्थितीत ई पीक पेरा ॲप अजून बंदच आहे आणि संबंधित तलाठ्यांना विचारले असता निवडणूकीच्या कामाचे कारण सांगून जबाबदारी झटकत आहेत.शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नाही यासाठी शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी वाशीम यांना आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या आदेशाने निवेदन देण्यात आले आहे. लवकरात लवकर पिक पेऱ्याचा विषय मार्गी लावा अन्यथा शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस शासन जबाबदार राहील. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख परम मुसळे शिवसेना जिल्हा समन्वयक सुनील पाटील चौधरी रवी भाऊ वानखेडे गजानन भुतेकर गोलू काळे व तालुक्यातील इतर शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

## पालघर जिल्ह्यात संविधान दिनानिमित्ताने संविधान जागर रॅली, नशामुक्त भारत अभियानांतर्गत आम्ही युवक, व्यसनमुक्तीचे सारथी



**दैनिक युवक आधार**

**पालघर/प्रतिनिधी :** नशा म्हणजे नाश, आम्ही युवक व्यसनमुक्तीचे सारथी अशा व्यसनमुक्तीच्या घोषणांनी जीवन विकास शिक्षण संस्थेचे श्री. स. तु. कदम विद्यालय पालघर परिसरात दुमदुमत होता. व्यसनमुक्तीसाठी रस्त्यावर उतरून निर्व्यसनी महाराष्ट्र सक्षम महाराष्ट्र असा संदेश देत महाराष्ट्र नशामुक्ती साठी सर्वांना आवाहन करत होते.

२६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्ताने संविधान जागर रॅली चे आयोजन करण्यात आले होते. नशामुक्त भारत अभियानांतर्गत जिल्हा परिषद पालघर समाजकल्याण विभाग, शिक्षण विभाग जीवन विकास शिक्षण संस्थेचे, श्री. स. तु .कदम विद्यालय पालघर आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान जागर रॅली चे आयोजन करण्यात आले होते. जीवन विकास शिक्षण संस्थेचे, श्री. स. तु .कदम विद्यालय चे मुख्याध्यापक सौ. संगिता गायकवाड, उपमुख्याध्यापक गणेश प्रधान, नशामुक्त भारत अभियान चे सदस्य, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा संघटक मिलिंद पाटील यांच्या हस्ते रॅलीली हिरवा झेंडा दाखवून संविधान जागर रॅली ची सुरुवात झाली. यावेळी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा संघटक यांनी संविधान जागर रॅली चे आयोजन करण्याचा उद्देश सांगताना म्हणाले की व्यसनांच्या विळख्यात आज तरूणाई अडकली आहे. ही गंभीर बाब आहे. तरूणांच्या मेंदू, मन, मनगट यांची सत्कासाठी गरज आहे तेव्हा तरूणांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे म्हणालेत. जिल्हा परिषद पालघर समाजकल्याण अधिकारी प्रकाश हसनाळकर यांनी दिलेल्या संदेश उपस्थित यांना वाचून दाखवण्यात आला. त्यात त्यांनी म्हटले होते की, आज तरुणांच्या या मोहिमेला मिळणारा वाढता पाठिंबा पाहता आज महाराष्ट्राची वाटचाल जलद गतीने व्यसनमुक्त महाराष्ट्राकडे होत आहे. राज्य व देश बलशाली करण्यासाठी व्यसनांपासून दूर राहावे आयुष्यात आलेल्या चढ उतारांमुळे मानसिक खच्चीकरण होऊन व्यसनाच्या आहारी जाऊ नका संघर्ष करा निर्व्यसनी राहून व्यसनमुक्त महाराष्ट्र घडविण्यात मोलाचा हातभार लावा असे आवाहन उपस्थित तरुणांना त्यांनी केले. जीवन विकास शिक्षण संस्थेचे, श्री. स. तु .कदम विद्यालय चे मुख्याध्यापक सौ. संगिता गायकवाड यांनी सांगितले की व्यसनमुक्तीच्या लढ्यामध्ये सहभागी असल्याचे सांगत निर्व्यसनी युवा पिढी राष्ट्रीय संपत्ती असल्याचे म्हटले व ही संपत्ती जतन करण्यासाठी आमचा सदैव सक्रिय सहभाग राहील. जीवन विकास शिक्षण संस्थेचे, श्री. स. तु .कदम विद्यालयातील उपस्थित विद्यार्थ्यांना मी कुठल्याही प्रकारचे व्यसन माझ्या आयुष्यात स्वतःला लागू देणार नाही. मी आजीवन निर्व्यसनी राहील. मी भारताचा नागरिक भारतातील प्रत्येक व्यक्ती निर्व्यसनी राहण्यासाठी मी प्रयत्नशील राहील. मी व्यसनमुक्तीसाठी असलेल्या कायद्यांचे काटेकोरपणे पालन करीन व नवीन कायदे होण्यासाठी मी सक्रिय राहील. मी सर्व नागरिकांमध्ये व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहून अमली पदार्थांच्या विरोधात आयुष्यभर कार्यरत राहण्याचा संकल्प करीत आहे. मी राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज आणि राज्यघटनेचा आदर करीन असा संकल्प नशामुक्त भारत अभियान चे सदस्य, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा संघटक श्री मिलिंद रूपचंद पाटील यांनी उपस्थितांना दिला. जीवन विकास शिक्षण संस्थेचे, श्री. स. तु .कदम विद्यालय परिसरातील नागरिक, ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सदर रॅलीत सहभाग घेऊन सक्रिय रित्या सहकार्य केले याबद्दल समन्वय समिती प्रितम घरत, बापूराव थोरात, दिनेश पारधी तसेच रुचिता ठाकूर, सारीका वर्तक , सर्व शिक्षक -शिक्षकेत्तर सहकारी वर्ग आणि विद्यार्थी यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.

# जुने फ्रीज विकत घेण्याचा बनाव १ लाख १२ हजारांची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** जुने वापरते फ्रिज विकत घेण्याचा बनाव करून खोटी माहिती देऊन वेगवेगळे स्कॅनर पाठवले आणि १ लाख १२ हजारांची ऑनलाइन फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रितिका अलुवालिया या कामोठे, सेक्टर ३४ येथे राहत असून, त्यांनी घरातील जुने फ्रिज विक्रीसाठी ओएलएक्स या सोशल मीडियावर टाकले. त्या वेळी त्यांना समोरील इसमाने यांचे नाव संजय कुमार असून खारघर येथे फर्निचरचे दुकान असल्याचे सांगितले आणि क्यूआर कोड पाठवतो, गुगल पेमधून स्कॅन करा आणि तुम्हाला पाच रुपये येतील, असे सांगितले. ती प्रोसेस केल्यानंतर ५ रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले. पुन्हा समोरील इसमाने १०० रुपये पाठवले. या वेळी पुन्हा एक स्कॅनर पाठवला. तो स्कॅन केला असता रितिका यांच्या आईच्या खात्यातून १४ हजार ५०० वजा झाले. त्यानंतर पुन्हा स्कॅन करा असे सांगितले असता, त्यांच्या आणि आईच्या खात्यातून एकूण १ लाख १२ हजार ३०० रुपये वजा झाले.

# म्हसावद थेपडे विद्यालयात भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील :** म्हसावद तालुका जिल्हा जळगाव २६नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय थेपडे विद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम भारतरत्न , घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधान प्रतीचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री पी. डी. चौधरी सर यांनी केले.

प्राचार्य श्री पी डी चौधरी सर यांनी अध्यक्षीय भाषणात भारतीय संविधानाविषयी सखोल माहिती दिली. तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक के पी पाटील सर यांनी प्रास्ताविक पर भाषणात भारतीय संविधानाचे मार्गदर्शक तत्वे ,अधिकार ,कर्तव्य याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले .




नंतर संपूर्ण गावात प्रभात फेरी काढण्यात आली. गावातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून माल्यार्पण केले .

डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना प्रास्ताविका व छोटे भारतीय संविधानाचे पुस्तक भेट स्वरूपात दिले. कार्यक्रमाचे छायाचित्रण श्री डी एम सोनवणे , श्री एस आर पवार आणि श्री गिरासे सर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी अनमोल असे सहकार्य केले.

# बँक बुडब्याला मत मागण्याचा अधिकार नाही; नरेन जाधव, कार्याध्यक्ष पेन ठेविदार संघर्ष समिती

## संचालकांकडून प्रत्येकी २४ कोटींची वसुली? पेण अर्बन बँक घोटाळ्यात सामूहिक जबाबदारी

**दैनिक युवक आधार**

**पेण दीपक लोके :** पेण अर्बन बँक घोटाळ्यातील २५ आरोपींवर प्रत्येकी २३ कोटी ९० लाख रुपयांची सामूहिक व वैयक्तिक वसुलीची जबाबदारी सहकार आयुक्तांनी निश्चित केली आहे. निश्चित मुदतीत ही वसुली न झाल्यास संबंधित संचालक व जबाबदार व्यक्तींवर व्याजासकट रक्कम वसूल करण्यात येईल, असे आदेश देण्यात आले आहेत. या घोटाळ्याची एकूण रक्कम ५९८.७२ कोटी रुपये असून, ती माजी संचालक व कर्मचाऱ्यांसह २५ जणांवर विभागली आहे.

माजी राज्यमंत्री मोहन पाटील यांच्या नेतृत्वाखाली २०११ मध्ये रास्तारोखो आंदोलन करण्यात आला होता. त्यानुसार सहकार कायदा १९६० च्या कलम ८८ ही चौकशी सुरु झाली होती. मात्र, या वसुलीची गती अत्यंत मंद असून, विशेष कृती समितीकडून सातत्याने दिरंगाई होत असल्याची तक्रार ठेवीदार संघटनांनी केली आहे. त्यामुळे सुरु असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेत रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाला 'उत्तरार्थी' म्हणून समाविष्ट करण्याची मागणी संघटनेने गेल्या १५ नोव्हेंबरला लेखी रूपाने नोंदवली आहे. बँकेचे



संचालक शिशिर धारकर, जयवंत गुरव, जयंतीलाल पुनामिया, संतोष श्रृंगारपुरे, मिलिंद पाडगावकर, हरिश्चंद्र पाटील, अनिल डेरे आणि बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पुरुषोत्तम जोशी, गिरिष गुप्ते, दिनेश सावंत, संगणक ऑपरेटर अजय मोकल यांचाही या घोटाळ्यात महत्वाचा सहभाग असल्याची नोंद या चौकशीत करण्यात आलेली आहे. आदी २५ जणांवर एकूण ५९७ कोटी रुपयांची थेट व वैयक्तिक वसुली लादली आहे. पेण अर्बन बँकेचे तब्बल १ लाख ४९ हजार ठेवीदार गेल्या १५ वर्षांपासून आपल्या ठेवी परत मिळवण्यासाठी संघर्ष करीत आहेत; मात्र अद्याप फक्त ६ कोटी रुपयांचीच वसुली झाल्याचे समोर आले आहे. विशेष कृती समितीच्या बैठका नियमित न होत नसल्याने ठेवीदारांमध्ये असंतोष वाढला आहे. पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेने ७५८ कोटींचा घोटाळा तर मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे आणखी ४८० कोटी रुपये अशी एकूण १२३८ कोटींची रक्कम बुडविल्याची नोंद आहे. ठेवीदारांना एक लाख रुपयांपर्यंत तत्काळ दिलासा देण्याची खात्री दिल्यानंतरही गेली चार वर्षे ती अंमलात आलेली नाही.

> **मागील १५ वर्षापासून या ठेवी परत मिळण्यासाठी या ठेवीदारांचा संघर्ष सुरु असून फक्त ६ कोटी रुपये वसुल झाले आहेत. मात्र, ही रक्कम वसुल करण्यासाठी नेमलेल्या विशेष कृती समितीकडून दिरंगाई होत आहे. यात बँक बुडवणाऱ्या संचालक मंडळाला सरकार विभाग अभय देत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. उच्च न्यायालयाने वसुलीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या विशेष कृती समितीच्या बैठकांही नियमित होत नाही. यात मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालणे आवश्यक आहे.**
>
> **- नरेन जाधव, पेण अर्बन बॅंक संघर्ष समिती**

> **ज्यांच्यावर वसुलीची जबाबदारी आहे, त्यांनी शासनाकडे अपिल केले असून काही प्रकरणांना स्थगितीही दिल्याची माहिती आहे. त्यामुळे ठेवीदारांचे हित अबाधित ठेवण्यासाठी आमच्या महासंघाला न्यायालयीन प्रकरणात उत्तरार्थी करण्याची मागणी केली आहे.**
>
> **-ॲड. जे. टी. पाटील, अध्यक्ष,**
> **रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ**

### ८० टक्के ठेवीदारांचे काय?

दहा हजार रूपये पर्यंतच्या ठेवीदारांना पैसे परत मिळाले आहेत. त्यानंतर २५ हजार रुपया पर्यंतच्या ठेविदारांनाही पैसे परत मिळाले आहेत. ही टक्केवारी केवळ १० टक्केच आहे. मात्र त्यानंतर रुपये एक लाखपर्यंत ठेवीदारांना पैसे मिळवून देणार असा दिलेला विश्वासही पुन्हा चार वर्ष धूळखात पडला आहे. त्यामुळे, उर्वरीत ८० टक्के ठेवीदारांचे काय? हकाचे पैसे मिळवण्यासाठी या बँकांचे ग्राहक सनदशीर मार्गाने आंदोलन करीत असताना आता विशेष कृती समितीकडूनही उदाशिनता दाखवली जात आहे. बँक बुडवणाऱ्या प्रमुख संचालकांना वाचवण्यासाठी अप्रत्यक्षरीत्या प्रशासकीय यंत्रणा मदत करीत असल्या चा संशय व्यक्त केला जात आहे

# शाखा तिथे संविधान' या शिवसेना अभियानाची मुंबई येथून सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** भारतीय संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला दि. २५ नोव्हेबर २०२५ रोजी शिवसेनेच्या मुख्यालय बाळासाहेब भवन येथे संविधानाची प्रस्ताविका व उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून 'शाखा तिथे संविधान' या शिवसेना अभियानाची भव्य सुरुवात शिवसेनेच्या नेत्या तथा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

ही मोहीम शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून राबवली जात आहे. या प्रसंगी शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना प्रवक्ते व मुख्य संयोजक किरण




सोनावणे, माजी आमदार राम पंडागळे, शिवसेना मीडिया समन्वयक दिनेश शिंदे, विलास जोशी तसे शिवसेना महिला विभाग प्रमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या,"भारतीय संविधान हे समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि संधी यांची हमी देणारे महान दस्तऐवज आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीही एकदा स्पष्ट शब्दांत सांगितले होते की न्यायालयात शपथ घ्यायची असेल तर ती संविधानावर हात ठेवूनच घेतली पाहिजे. 'शाखा तिथे संविधान' या उपक्रमामुळे शिवसेना संविधाननिष्ठ पक्ष आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित होईल."

अभियानाचे प्रमुख संयोजक व प्रवक्ते किरण सोनावणे म्हणाले,"शिवसेनेच्या इतिहासातील हा सुवर्ण क्षण आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक शिवसेना शाखेत संविधानाची प्रस्ताविका व प्रत ठेवून संविधानिक मूल्यांचा व्यापक प्रसार केला जाईल. एक शायर म्हणतो, 'दोस्त, कभी फुरसत मिले तो मुझे पढ़ना, मुझमें तेरे हर उलझनों का समाधान है... मैं कोई और नहीं, तेरे देश का संविधान हूँ'."

या अभियानांतर्गत संविधान बाग, संविधान संग्रहालय उभारणे, देशभरातील सर्व रेल्वे स्थानकांवर व विमानतळावर संविधानाची प्रस्ताविका प्रदर्शित करणे, तसेच संविधानासाठी कार्यरत व्यक्ती व संस्थांचा सत्कार आयोजित करणे यासारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. लोककलावंतांचाही या अभियानामध्ये सहभाग ठेवण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माजी आमदार राम पंडागळे यांनी केले.

# सुधागड एज्युकेशन सोसायटी चे कोपरा विद्यालयास आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगडचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू ह्याच्या नेतृत्वा खाली ९ वर्ष समाज सेवेचे उपक्रम राबवत आहे.

आज आदर्श शाळा तालुका हा उपक्रम हाती घेऊन रायगड जिल्हातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळा निवडत आहे त्या प्रमाणे पनवेल तालुका मधून सुधागड एज्युकेशन सोसायटी ह्या शाळेला पनवेल तालुका आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला सादर पुरस्कार आवाज महामुंबईचा न्यूज चॅनलचे सपादक मिलिंद खारपाटील (सल्लागार )यांच्या शुभ हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका गावित मॅडम यांनी स्वीकारले यावेळी बोलताना गावित मॅडम म्हणाल्या की "आत्ता पनवेल तालुक्यातून आमच्या शाळेला आदर्श शाळा म्हणून पुरस्कार मिळाला त्या बद्दल मी चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड चे आभारी आहोत आणी या पुढे आमची जबाबदारी वाढेल व शाळेतील



मुलांसाठी आणखी काही जास्तीत जास्त विकास कसा होईल ह्या गोष्टीवर भर देण्यात येईल" तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संतोष तांबोळी (मा. सरपंच), संतोष गायकर (मा. उपसरपंच) ,वैभव गायकर (पत्रकार),जेष्ठ नागरिक सीताराम म्हात्रे (मीडिया सल्लगार ) यांची उपस्थिती होती. तर शाळे तर्फे नूतन जगताप , बाळासाहेब सोलासे , प्रकाश पाटील , लक्ष्मण इगोले , सुप्रिया लांडगे , जयसिंग थोरात , संतोष पाटील , सुनील निकुंभ , वैशाली पाटील , संगीता मगरे , जाकीरहुसेन मान्सूरी व कर्मचारी उपस्थितीत होते. तर संस्थे तर्फे संस्थे चे संस्थापक अध्यक्ष विकास कडू, कु विनायक म्हात्रे (पनवेल तालुका अध्यक्ष), साजन वास्कर (पनवेल तालुका उपाध्यक्ष),कु मयुरेश करमेलकर (प्रसिद्धी प्रमुख रायगड), कु अभिषेक माळी सदस्य, कु विवेक कडू सदस्य हे उपस्थित होते. कार्यक्रम चे प्रास्ताविक विकास कडू यांनी केले ते बोलताना म्हणाले "सुधागड एज्युकेशन सोसायटी चे कोपरा विद्यालय ही एक शाळा नसून एक कुटूंब आहे, कारण शाळेत मुलांच्या शिक्षणा ची खूप चांगल्या प्रमाणात काळजी घेतली जाते विशेषता सुरक्षा च्या बाबतीत मुलाच्या शारीरिक विकास अर्थात खेळा कडे,मुलांना सुसज्य सायन्स लॅब, नीट नेटके ग्रंथलंय या सारख्या अनेक सोयी आहेत आज वर या शाळेला कुठलाही गालबोट लागलेला नाही म्हणून पनवेल तालुक्यातील ही आदर्श शाळा आहे म्हणूनच आमच्या संस्थे ने या शाळेला आदर्श शाळा पनवेल हा पुरस्कार देण्याचे ठरवले. तर आभार प्रदर्शन कु विनायक म्हात्रे यांनी केले शाळेतर्फे चाईल्ड केअर सामाजिक संस्थाच्या पदाधिकाऱ्याचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# डॉ. गौरी पालवे–गर्जे आत्महत्या प्रकरणी, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कुटुंबीयांची घेतली भेट; आरोपींवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**बीड / प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील पिंपळनेर येथे आज विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्व. डॉ. गौरी पालवे–गर्जे यांच्या आई-वडिलांची भेट घेऊन त्यांच्या मनातील प्रश्न, वेदना आणि न्यायाबाबतच्या अपेक्षा जाणून घेतल्या. भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, "गौरी पालवे–गर्जे यांचा मुंबईतील मृत्यू अत्यंत दुर्दैवी आहे. तिच्या कुटुंबाने काही महत्त्वाची अतिरिक्त माहिती पोलिसांना द्यायची इच्छा व्यक्त केली; परंतु त्यांची नोंद झाली नव्हती. या तक्रारीची मी तत्काळ दखल घेऊन मुंबई पोलिसांशी तसेच स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांशी बोलले असून, पुढील दोन-तीन दिवसांत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्या सर्व पुरवणी जबाबांची नोंद केली जाणार आहे."

कुटुंबीयांनी आरोपीचे भाऊ अजय गर्जे आणि बहीण शीतल आंधळे यांनाही अटक करावी, अशी मागणी केली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गौरीवर पूर्वी अनेकदा मारहाण झाल्याचे त्यांनी सांगितल्याने या प्रकरणाचे मूळ



कारण नीट समजून घेणे अत्यावश्यक असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

"उपसभापती म्हणून जबाबदारी आहेच, पण आई म्हणूनही हे प्रकरण मन हेलावून टाकणारं आहे. कुटुंबीयांना सक्षम सरकारी वकील मिळावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याशी मी स्वतः बोलणार आहे. तपासात कुठलाही दबाव सहन केला जाणार नाही," असे त्यांनी सांगितले.

न्यायप्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी डॉ. गोऱ्हे यांनी मुंबई पोलिसांना दोन महत्त्वाचे निर्देश दिले—

पहिला, तपासाच्या प्रगतीबाबत अधिकृत बुलेटीन दर दोन दिवसांनी पत्रकारांना देण्यात यावे, जेणेकरून अफवा आणि अप्रमाणित माहितीला आळा बसेल.दुसरा, अशा संवेदनशील खटल्यांमध्ये न्यायालयीन सुनावणीदरम्यान पीडितेवरच आरोप केले जातात; म्हणून संपूर्ण सुनावणीचे इन कॅमेरा व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यासाठी न्यायालयात विनंती करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

तसेच जवळील गावातील एका पॉक्सो प्रकरणातील तक्रार नोंदवण्यात उशीर झाल्याबाबतही त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. "महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांच्या तक्रारींची त्वरित आणि गांभीर्याने नोंद होणे आवश्यक आहे. गावांमध्ये पॉक्सो कायद्याबाबत जागृती वाढवण्यासाठी ग्रामसभा घेणे आवश्यक आहे," असे डॉ. गोऱ्हे म्हणाल्या. पॉक्सो प्रकरणातील पीडित मुली आणि पालकांना तपासाच्या प्रगतीची नियमित माहिती देण्याबाबत भारतीय न्यायसंहितेतील नव्या तरतुदींची माहितीही त्यांनी दिली.

**कुटुंबाला न्यायप्रक्रियेतील अडथळे दूर करण्यासाठी आर्थिक मदत**

गौरी पालवे–गर्जे यांचे आई-वडील न्यायासाठी लढत असताना त्यांच्यावर आर्थिक ताण येऊ नये, यासाठी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुढाकार घेतला आहे. पुढील न्यायालयीन प्रक्रियेसाठी आवश्यक ती आर्थिक मदत वैयक्तिक पातळीवरून कुटुंबीयांना दिली आहे. "न्याय मिळविण्यासाठी कोणतीही कमतरता राहू देणार नाही. कुटुंबाच्या पाठीशी मी वैयक्तिकरीत्या उभी आहे," असे त्या म्हणाल्या.

"गौरीच्या कुटुंबाला भेट देऊन त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला. न्याय मिळण्यासाठी सरकार आणि पोलीस यंत्रणा तितक्याच कटाक्षाने काम करतील," असा निर्धार डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; मालेगाव पुन्हा हादरले.. मुल्हेर गावात निषेध मोर्चा..

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी**

**दिपक गायकवाड बागलाण:** अल्पवयीन बालीकेवर अत्याचार करून खून केल्याची घटना १६ तारखेला डोंगराळे येथे घडली होती या घटनेचा निषेध म्हणून मुल्हेरकर ग्रामस्थांनी,ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच यांच्या उपस्थितीत गुरुवार रोजी सकाळी गाव बंदचे आव्हान केले होते. या आव्हानास ग्रामस्थ, व्यापारी वर्गाने १०० % प्रतिसाद देत गाव बंद ठेवले. या हत्या व अत्याचाराच्या निषेधार्थ गावोगावी निषेध मोर्चा पहावयास मिळत असून घटनेचे पडसाद तालुक्यातील ग्रामीण भागात उमटत आहेत. यात आरोपीने अजान बालिकेवर शारीरिक अत्याचार करून खून केला त्यास तत्काळ फाशीची शिक्षा द्या अशी मागणी शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पोलीस प्रशासनाकडे केली. मोर्चाची सुरुवात जनता विद्यालय मुल्हेर पासून मेन गल्ली ते ग्रामपंचायत आवारात सांगता झाली .पीडित बालिका कै.यज्ञा जगदीश दुसाने हीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली परंतु आरोपीस फाशीची शिक्षा होईल तोच खरा दिवस न्याय मिळेल आणि तीच श्रद्धांजली होईल असे मताचे निषेधकर्त्यांनी भाष्य केले.यावेळी उपस्थित ग्रामस्थ सरपंच निंबा भानसे, उपसरपंच योगेश सोनवणे, सतीश शुक्ल, शरद गांगुर्डे, चंद्रकांत खरे, बन्सीलाल बत्तीसे, संदीप निंबादास जगताप, रामदास जाधव,




दत्ता येवला,आबा येवला,राहुल येवला, तुषार येवला, पश्चिम महाराष्ट्र हिंदू धर्म जागरण प्रचारक प्रदीप बच्छाव, डॉ. हंसराज क्षिरसागर,सुनील येवला,योगेश कुटे,तुषार तिवारी,जकिर शेख,मीनाक्षी बागुल,सुनीता गर्गे, माया येवला, दिपाली बोरसे, आशाबाई जगताप,हर्षद जगताप,विनोद शिंदे,दीपक गायकवाड, संदीप गांगुर्डे, इंद्रजीत वाघ, पवार दिपक आदी पत्रकार,शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक तसेच व्यापारी वर्ग यांनी गावातील दुकाने स्वयं:स्फूर्तीने बंद ठेवून झालेल्या घटनेविरुद्ध निषेध व्यक्त केला.यादरम्यान मालेगाव पुन्हा अल्पवयीन मुलीवर १३ वर्षीय बालिका के वर ५५ वर्षीय इसमाने नामे दीपक छाजेड संशयित आरोपीस अटक करून मालेगाव पोलीसयांनी पोस्को अंतर्गत विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा बुधवारी दिनांक २६ ला दाखल झाला असून आरोपीस न्यायालयाने २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत त्यामुळे परिसरात संतापाचे वातावरन पसरले आहे

# नार्को को-ओर्डीनेशन जिल्हास्तरीय समितीची बैठक

## तडीपारीची प्रलंबित प्रकरणे तात्काळ मार्गी लावा - जिल्हाधिकारी मनुज जिंदल

**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी, (जिमाका) :** अंमली पदार्थांच्या विरोधात कोस्टगार्डने बोटींची तपासणी करावी. पोलीसांसह सर्व यंत्रणांनी सतर्क राहून गांभीर्याने कारवाई करावी. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रलंबित असणारी तडीपारीची प्रकरणे तात्काळ मार्गी लावावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी दिले.

नार्को को-ओर्डीनेशन यंत्रणेच्या जिल्हास्तरीय समितीची बैठक आज झाली. बैठकीला पोलीस अधीक्षक नितीन बगाटे, अपर पोलीस अधिक्षी बी.बी. महामुनी, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुध्द आठल्ये, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर जगताप, उत्पादन शुल्क



अधिक्षक कीर्ती शेडगे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त दीपक घाटे, अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त शशिकांत यादव, पोलीस निरीक्षक नितीन ढेरे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. जिंदल यांनी विभागनिहाय तसेच उपविभागानुसार सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले, शिक्षण विभागाने शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती मोहीम राबवावी. उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तसेच पोलीस उपअधिक्षक कार्यालयाकडे प्रलंबित असणारे तडीपारीचे प्रस्ताव प्राधान्याने मार्गी लावावेत. सर्व विभागांनी गंभीरपणे अंमली पदार्थ विरोधी मोहीम हाती घेवून, सतर्क राहून कारवाई करावी. विशेषत: सागरी मार्गावर अधिक लक्ष केंद्रित करावे. दापोली सारख्या समुद्र किनाऱ्यांवर पोलीसांनी विशेष लक्ष केंद्रीत करावे. कोस्ट गार्डने गस्त घालायला हवी. सर्वसामान्यांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेऊन सतर्कतेने सर्व यंत्रणेने तपासणी करावी. कृषी आणि वन विभागाने गांजाची लागवड होणार नाही यासाठी सतर्क रहावे.

पोलीस अधीक्षक श्री. बगाटे म्हणाले, यादीवरील गुन्हेगारांवर लक्ष ठेवून त्यांच्याबाबत आवश्यक ती कारवाई करावी. अशा गुन्हेगारांची झडती घेतली असेल, पंचनामा केला असेल तर त्याची माहिती द्यावी. कोस्ट गार्डने बोटींची तपासणी करुन कारवाई केली असेल तर त्याविषयीची माहिती द्यावी. पोलीसांनी संशयास्पद टपऱ्यांची तपासणी करावी. एनडीपीएसच्या केसेस मार्गी लावाव्यात. त्याबाबतचे निर्णय लवकर घ्यावेत.

मेडिकल दुकांनांची तपासणी करताना अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसोबतच पोलीसांनी जावयाचे आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषध देण्यात येऊ नये. याबाबत अन्न औषध प्रशासनाने मेडिकलला सूचना द्यावी त्याविषयी जनजागृती करावी. तसेच कोणती औषधे द्यावीत वा देऊ नयेत याबाबतची प्रसिध्दी करावी. महाविद्यालय परिसरात टपऱ्यांवर जर अंमली पदार्थांची विक्री होत असेल, तर त्याची माहिती पोलीसांना द्यावी. बंद पडलेल्या कारखान्यांना सातत्याने भेटी देऊन त्याबाबत नियमित तपासणी व्हावी.

---

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, तांबाराजुरी येथील विद्यार्थ्यांनी अनुभवला आठवडी बाजार

### कोणी विकले पोहे, तर कोणी विकले दही धपाटे



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - पाटोदा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, तांबाराजुरी येथे बुधवार दिनांक २६ नोव्हेंबर रोजी कोणी वडापाव, भजे, चहा, शाबू वडे, पोहे विकले, कोणी दही धपाटे विकले तर कोणी आपल्या शेतातील भाजीपाला विकून आठवडी बाजाराचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी ही जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा. तांबाराजुरी आयोजित आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले. या बाजारात जवळपास बारा ते पंधरा हजारापर्यंत उलाढाल झाली. ६८ विद्यार्थी संख्या असलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, तांबाराजुरी शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी या बाजाराचे नियंत्रण केले. मुलांनी आपल्या शेतातून आणलेला भाजी-पाला कांदे, बटाटे, कोथिंबीर, टोमॅटो, भेंडी, गवार, लसूण, पेरू, लिंबू, केळी या सह खाद्यपदार्थांमध्ये दही धपाटे, शाबु वडे, वडापाव, मसाला पापड, पोहे, भजे, बिस्किट, चॉकलेट, चिक्की आदी पदार्थ विद्यार्थ्यांनी बाजारात विक्रीसाठी ठेवले होते. बाजारातून गावातील महिला व पुरुष, पालक, ग्रामस्थ यांनी आवर्जून लहान मुलांकडून खरेदी केली. या वेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री बबन पवार सर, गणेश तांबे, ग्रा. पं.सदस्य केशव तांबे, विकास तांबे, विलास तांबे, भुजंग तांबे, इन्नुस शेख, हरिदास तांबे सर, अण्णासाहेब तांबे, मधुकर तांबे, शालेय समितीचे सर्व सदस्य यांच्या सह आदी ग्रामस्थांनी बाजाराला भेट देऊन मुलांचे कौतुक करून खरेदी केली. तसेच महिलांची उपस्थिती विशेष होती, सर्व महिलांनी चिमुकल्यांकडून खरेदी केली. या वेळी बोलताना केंद्रप्रमुख श्री मळेकर सर म्हणाले की, विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान मिळावे या साठी शिक्षकांच्या संकल्पनेतून आठवडी बाजार उपक्रम राबविण्यात आला. यातून विद्यार्थ्यांना खरोखरच खूप काही शिकायला मिळते. सोबतच गणित विषयाशी निगडित अन्य व्यावहारिक ज्ञानही त्यांना मिळते. शाळा विविध उपक्रम नेहमीच राबवत असते, या पुढेही राबवले जातील असे केंद्रप्रमुख श्री मळेकर सर यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापिका गाडेकर मॅडम, तांदळे सर, वायकर मॅडम, रहाटे मॅडम, अनिकेत तांबे सर सह इतरांनी परिश्रम घेतले.

---

## देवेंद्र फडणवीस हे लोकशाही आणि महाराष्ट्र धर्माला फासावर लटकवणारे 'जल्लाद': हर्षवर्धन सपकाळ

- अहिल्यानगरचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांच्या अपहरण प्रकरणी काँग्रेसचे श्रीरामपूरमध्ये दिवसभर ठिय्या आंदोलन
- प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांनी श्रीरामपूरला जाऊन गुजर यांची विचारपूस केली, पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांना विचारला जाब

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा कारभार औरंगजेब व नथुरामसारखा थंड डोक्याने कारस्थाने करणारा आहे. फडणवीस हे केवळ दरिंदे (क्रूर) नाहीत तर आता ते लोकशाही, माणुसकी, संस्कृती व भारताच्या संविधानाला फाशी देत आहेत. देवेंद्र फडणवीस हे लोकशाही आणि महाराष्ट्र धर्माला फासावर लटकणारे जल्लाद आहेत, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

अहिल्यानगरचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांना भाजपच्या गुंडांनी अपहरण करून मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याविरोधात काँग्रेस पक्षाने दिवसभर ठिय्या दिला. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी तातडीने श्रीरामपूरला भेट दिली आणि स्थानिक आमदार हेमंत ओगले यांच्यासह जिल्हा पोलीस अधिक्षकांची भेट घेतली. यावेळी श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार करण ससाणे उपस्थित होते. हर्षवर्धन सपकाळ यांनी, पोलीस हे कुणाच्या दबावाखाली काम करीत आहेत? दडपशाही करणाऱ्या स्थानिक गुंडांना पोलीस कुणाच्या आशिर्वादाने पाठीशी घालत आहेत, असा जाब विचारत पोलिसांची आणि स्थानिक गुंडांना पाठीशी घालणाऱ्यांची दडपशाही खपवून घेणार नाही असा सज्जड दम दिला. त्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी दिवसभर ठिय्या आंदोलनात सहभागी झालेल्या काँग्रेस कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. शेवटी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून संविधान रक्षणाची शपथ घेतली.

यावेळी माजी सभापती बाबासाहेब दिघे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, जिल्हा काँग्रेस चे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे पंचायत समितीचे माजी सभापती वंदनाताई मुरकुटे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

---

## ओरायन मॉल मध्ये असंभव चे विशेष प्रीमियर; शहरातील प्रतिष्ठित मंडळींची मोठी उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल शहरातील एकमेव मॉल असलेल्या ओरायन मॉल मध्ये असंभव या मराठी चित्रपटाचे विशेष प्रीमियर मोठ्या उत्साहात पार पडले.यावेळी असंभव चित्रपटाची स्टारकास्टसह पनवेल शहरातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.मराठी अभिनेत्यांना पाहण्यासाठी शहरात मोठी गर्दी झाली होती.

ओरायन मॉलचे मालक चित्रपटाचे सहनिर्माते मंगेश परुळेकर ,शहरातील प्रसिद्ध



व्यावसायिक संजय पोतदार हे या चित्रपटाचे सहनिर्माते यावेळी उपस्थित होते. यांच्यासह अभिनेते सचित पाटील,पुष्कर क्षोत्री,मुक्ता बर्वे,नितीन वैद्य,तेजस देसाई,शर्मिष्ठा राऊत आदींसह या प्रीमियरला आ.प्रशांत ठाकुर,आ.विक्रांत पाटील,भाजप नेते बाळासाहेब पाटील,माजी सभागृह नेते परेश ठाकुर,शिंदे सेनेचे नेते चंद्रशेखर सोमण,मा. नगरसेवक अनिल भगत, उद्योजक विजय लोखंडे आदींसह शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.यावेळी पनवेलकरांसाठी असंभव चित्रपटाचे विशेष शो चे देखील आयोजन करण्यात आले होते.या शोला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. चित्रपटाच्या स्टारकास्टने यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला.या चित्रपाटाचा गोवा येथे होणाऱ्या इफ्फि 2025 आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवड झाल्याने देखील उपस्थितांनी चित्रपटाच्या स्टारकास्ट आणि निर्मात्यांचे अभिनंदन केले,

---

## साखरे बोरगांव येथील गणेश जगदाळे यांचे निधन

### एक अविवाहीत उमदा तरुण गेल्याने पंचक्रोशीत हळहळ

**दैनिक युवक आधार**



**पाटोदा (प्रतिनिधी)** - बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव येथील श्री.काशी विश्वेश्वर संस्थानचे ह.भ.प.शिवाजी बाबा जगदाळे यांचे एकुलते एक चिरंजीव गणेश जगदाळे (गणु दादा) हा एक उमदा होतकरू तरूण पुणे येथे त्याला अचानक चक्कर आली. नातेवाईकांनी त्याला रुग्णालयात दाखल केले, परंतु तेथेच त्याची प्राणज्योत मालवली. मंगळवारी दि.२५ नोव्हेबंर-२०२५ रोजी सकाळी मौजे साखरे बोरगांव येथे गणेश जगदाळे यांच्या वर त्यांच्या शेतात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी जि.प.सदस्य श्री. भारत बप्पा काळे, विविध संस्थानचे महाराज, विविध गावचे सरपंच, उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते प्रतिष्ठीत नागरीक, नातेवाईक, मित्र परिवार यांची उपस्थिती होती. दोन मिनिटे शांतता पाळून ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दाजंली वाहण्यात आली. एक निर्व्यसनी उमदा, होतकरू तरुणाचे अचानक निधन झाल्यामुळे बालाघाटावरील पंचक्रोशीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

---



## रेवदंडा एस टी स्टँडची लाजिरवाणी अवस्था ? शासन बसलेलं, जनता त्रस्त

**दैनिक युवक**

**निलेश फुंडे रेवदंडा :** प्रवाशांना ताटकळत उभे राहण्याची वेळ, बस स्थानकाची अवस्था पर्यटनाला मारक. रेवदंडा एस.टी. बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असून प्रवाशांसह वाहनचालकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानक परिसरात मोठमोठे खड्डे, बस येताना होणारे धक्के, बेशिस्त वाहने, अस्वच्छता आणि गुटख्याच्या दुर्गंधीने अक्षरशः प्रवासी त्रस्त झाले आहेत. प्रशासनाचे प्रचंड दुर्लक्ष व परिवहन विभागाची उदासीनता यावर नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. अलिबाग–मुरूड–रोहा या तीन तालुक्यांना जोडणाऱ्या मध्यवर्ती ठिकाणामुळे रेवदंडा एसटी स्टँडवर दररोज मोठी प्रवासीवर्दळ असते. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचून निर्माण झालेली तळी आता कोरडी पडल्याने खड्ड्यांचे भयावह रूप स्पष्ट दिसत आहे. एसटी बस येताना प्रवाशांना धक्कादायक झटके बसतात. चालकांना हे खड्डे चुकविताना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत असून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.त्यातच, बसस्थानक परिसरात लहान–मोठी वाहने बेशिस्तपणे उभी करून ठेवली जातात, ज्यामुळे एसटी बसलाच जागा मिळत नाही. वाहतूक कोंडी निर्माण होत असून बस चालकांना स्थानकात प्रवेश करणे कठीण झाले आहे. ही बेशिस्त पार्किंग प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करणारी ठरत आहे.अस्वच्छतेचा कहर इतका वाढला आहे की बसस्थानक परिसर गुटख्याच्या पिचकाऱ्या, थुंकलेल्या जागा आणि दुर्गंधीने भरून गेलेला आहे. त्यामुळे प्रवाशी विशेषतः महिला, मुले आणि वृद्ध बसस्थानकाच्या आत बसणे टाळून बाहेरच थांबणे पसंत करतात. बाराही महिने येथे देशांतर्गत व परदेशी पर्यटक येत असतात, पण बसस्थानकाची ही बिकट अवस्था रेवदंडाच्या प्रतिमेला तडा देणारी ठरत आहे.

रायगड जिल्ह्यातील ९० टक्के एसटी स्टँडचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. मग फक्त रेवदंडा एसटी स्टँडचेच काम मागे का? हा सवाल नागरिक सातत्याने विचारत आहेत.परिवहन खाते दिवाकर रावते, नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आता परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे असूनही रेवदंडा एसटी स्टँडची दुरवस्था कायम यावर शासनाची भूमिका संशयास्पद असल्याची चर्चा रंगली आहे.प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष, परिसरातील घाण, खड्डे आणि पार्किंगचा अराजक या प्रश्नांची जबाबदारी कोण घेणार? रेवदंडा एसटी स्टँडचा विकास नेमका अडतो कुठे? या सर्व प्रश्नांची उत्तरे परिवहन विभागाने तातडीने द्यावीत, अशी नागरिकांकडून जोरदार मागणी होत आहे.

---

## उरण मधील नगराज शेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये सविधानदिन मोठया उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे** : आज देशभरात 26 नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून साजरा होत आहे. हे औचित्य साधून उरण मधील नगराज शेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये सविधानदिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आलासकाळी स्कूलमध्ये नियमित प्रार्थने नंतर काही राष्ट्रभक्ती परगीतांनी कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी काही विद्यात्र्यांनी सविधानदिना बाबत माहिती सांगितली.शेवटी स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे यांनी.भारताच्या सविधानदिन बाबत माहिती देताना स्पष्टकेले की संपूर्ण जगात भारत देशाची लोकशाही ही सर्वात मोठी लोकशाही असून या



सवीधानामुळेच आज आपण सारे आनंदाने आणि एकोप्याने राहत आलो आहोत सवीधानाच्या शब्दांची ताकद इतकी प्रचंड आहे कीया शक्ती वर आज देशला स्वतंत्र्य मिळून आज 78 वर्ष होत असताना भारतीय सविधान आपला अमृत मोह्त्सव साजरा करीत आहे.


असे सांगून त्या पुढे म्हणाल्या देशांतील देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद,पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू,सरदार वल्लभभाई पटेल.सी .राजगोपालचारी,मौ.अब्दुल कलाम आजाद थोर विचारवंतांनी एकत्रितपणे येऊन ही या भारताच्या सविधानाची निर्मिती करण्याची जबाबदारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपविली होती, या भारताच्या सविधान समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर ती पूर्णपणे समर्थपणे पारपडली आणि "हे सविधान आम्ही भारतीय लोक भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याचा सर्व नागरिकास सामाजिक ,आर्थिकव राजनैतिक न्याय विचार,अभिव्यक्ती,विश्वास ,श्रद्धा,व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधिची समानता निश्चितचपणे प्रप्त करून देण्याचाव राष्ट्राची एकताआणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता संकल्पपूर्वक निर्धार करून 26 नोव्हेंबर 1949 साली देशाला अर्पण केली.हाच तो तो दिवस आपण आज साजरा करीत आहोत तो म्हणजे सविधानदिन यानंतर बरोबर 26 जानेवारी 1950 रोजी देशभरात त्याची अमलबजावणी झाली तोच तो दिवस आपण प्रजासत्ताकदिन म्हणून साजरा करतो असे सांगून विद्यर्त्यानी भारत माताकी जय अशा घोषणा देत या सविधान दिनाची सांगता थोर कवी साने गुरुजी यांच्या "बलसागर भारत होवो विश्वात शोभूनी राहो"या अमर राष्ट्रभक्तीप्र गीताने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी26/11च्यामुंबईत झालेल्या अतेरेकी हल्ल्यांतील बळीपडलेल्या नागरिकांना पोलिसांना नाट्यसादरीकरण करून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित केली.

---

## राज्य सांस्कृतिक पुरस्काराला वामनदादा कर्डक यांचे नाव...!; सांस्कृतिक कार्य विभागाचा निर्णय

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** लोककला क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या राज्य सांस्कृतिक पुरस्काराला आता लोककवी वामनदादा कर्डक यांचे नाव देण्यात आले आहे.या संदर्भात सांस्कृतिक कार्य विभागाने दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी ' शासन निर्णय' जारी केला. यापुढे या पुरस्काराला 'लोककवी वामनदादा कर्डक राज्य सांस्कृतिक पुरस्कार – लोककला क्षेत्र' असे नावाने ओळखले जाईल.



**लोककलेला योग्य प्रतिष्ठा**

राज्यातील लोककला परंपरेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कलावंतांना सन्मानित करण्यासाठी राज्य सरकारदरवर्षी सांस्कृतिक पुरस्कार प्रदान करते. या पुरस्काराला मान्यवर व्यक्तिमत्वाचे नाव देण्याचा प्रस्ताव काही काळ विचाराधीन होता. लोककलेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या वामनदादा कर्डक यांच्या दीर्घकालीन कार्याचा सन्मान म्हणून हा निर्णय घेण्यात आला असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले.लवकरच या नव्या नावाने सुधारित पुरस्कार जाहीर केला जाणार आहे.

**लोककवी वामनदादा कर्डक यांचे कार्य...!**

महाराष्ट्रातील लोककलेचा ठसा उमटवणारे, सामाजिक बदलाचे प्रवर्तक आणि दलित साहित्य चळवळीचे सांस्कृतिक व्यासंगी म्हणून वामनदादा कर्डक (१९१४–२००४) यांचे नाव विशेष मानाने घेतले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची लोकाभिमुख मांडणी त्यांनीजनमानसात पोहोचवली.. सशक्त शब्दांकन, धारदार आशय आणि लोकभाषेतील ओघवती शैली ही वामनदादांच्या काव्यशैलीची वैशिष्ट्ये मानली जातात. त्यांच्या गीतांनी आणि पोवाड्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रवाहावर कायमस्वरूपी छाप पडली आहे.